। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २५० वा । गुरूवार दिनांक १८ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### महाद्वारात प्रवेश करत असताना सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संजोता बाळासाहेब बेडक्याळे, वय ४० वर्षे, रा. अजिंक्यतारा सोसायटी बी ३(५) चेंबुर मुंबई या दि.१६.१२.२०२५ रोजी १२.१५ वा. सु. त्यांच्या मैत्रीणीसोबत देव दर्शनासाठी तुळजाभवानी मंदीरात जात असताना महाद्वारात प्रवेश करत असताना संशईत स्नेहा वय २५ वर्षे, निलाबाई वय ५५ वर्षे, दोघी रा. राशन ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांनी संजोता बेडक्याळे यांचे पर्स मधील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २,२३० असा एकुण १,१०,२३० किमंतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संजोता बेडक्याळे यांनी दि.१६.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीवरुन पोलीसांनी स्नेहा वय २५ वर्षे, निलाबाई वय ५५ वर्षे, दोघी रा. राशन ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना ताब्यात घेवून त्यांचे कडे सदर गुन्ह्या बाबत चौकशी केली असता नमुदांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपास सुरु आहे.

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

लोहारा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राहुल रा. वडगाववाडी ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.१५.१२.२०२५ रोजी हॉटेल वैभवीच्या पाठीमागील मोकळ्या जागेत अंदाजे १,८०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

वाशी पोलीस ठाण अंतर्गत दत्ता रा. कोळेवाडी ता. वाशी जि. धाराशिव हे दि.१५.१२.२०२५ रोजी १३.१५ वा. सु. पारगाव येथे आपल्या पानटपरी मध्ये अंदाजे १,९०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान उमरगा पोलीसांनी दि.१६.१२.२०२५ रोजी उमरगा शहरात प्रभात हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागेत छापा टाकला. यावेळी आनराज रा. पळसगाव ता. उमरगा हे मोकळ्या जागेत कल्याण जुगाराचे साहित्या एकुण ९२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पो. ठाणेच्या पथकास आढळले. उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.



# जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन कडक कारवाई होणार - जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन काही बोगस डॉक्टरांनी अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय सुरू केला असून,अशा बोगस डॉक्टरांचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच भविष्यात कोणीही अशा प्रकारचा व्यवसाय करण्याचे धाडस करणार नाही,असा कायमस्वरूपी धडा शिकवण्यासाठी आरोग्य विभागाने ठोस पावले उचलावीत,असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी तथा अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक (बोगस डॉक्टर) शोधन जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष श्री. कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकत्याच आयोजित अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक (बोगस डॉक्टर) शोधन जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक तथा समिती सदस्य डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,उपजिल्हा पोलीस अधीक्षक तथा समिती सदस्य सचिव,पथक प्रमुख,तालुका आरोग्य अधिकारी (ग्रामीण), वैद्यकीय अधीक्षक (ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालय) तसेच गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत माहिती देताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.हरिदास यांनी सांगितले की,आजपर्यंत जिल्ह्यात अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या ६९ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी १७ व्यावसायिकांवर विविध पोलीस ठाण्यांत तपास सुरू आहे, तर ३६ प्रकरणे न्यायप्रलंबित आहेत. यापुढे ग्रामीण व शहरी भागात बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी ग्रामीण व शहरी वैद्यकीय पथकांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबवून सर्वांवर कठोर कारवाई करावी. जिल्ह्यात पुन्हा एकही बोगस डॉक्टर अशा प्रकारचा व्यवसाय करू शकणार नाही,असा जरब निर्माण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी पुजार यांनी दिले.मात्र कारवाई करताना संबंधित व्यावसायिकांची संपूर्ण माहिती तपासून घ्यावी.यापूर्वी गुन्हा दाखल असलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करताना न्यायालयाचा अवमान होणार नाही व शासनाच्या निर्णयांच्या अधीन राहून कार्यवाही करावी,असेही त्यांनी स्पष्ट केले.

कारवाई करताना पंचांच्या समक्ष व्हिडिओ शूटिंग,छायाचित्रण,मुद्देमाल जप्ती करून त्यावर पंचांच्या सह्या घ्याव्यात व जप्त मुद्देमाल सीलबंद करून संबंधित पोलीस ठाण्यात जमा करावा.स्थळपंचनामा स्वतंत्र फाईलमध्ये ठेवावा.तसेच ही कारवाई करताना संबंधित पोलीस ठाण्याचे ठाणेप्रमुख किंवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी सोबत असणे आवश्यक असल्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी पुजार यांनी दिल्या.

सद्यस्थितीत जिल्ह्यात तालुकानिहाय ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांची संख्या पुढीलप्रमाणे आहे - धाराशिव १९४, तुळजापूर ५२,लोहारा २७,उमरगा ५४,कळंब ५१,भूम ३९,वाशी १५ व परंडा ४४ अशा प्रकारे जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील ग्रामीण भागात एकूण ४७६ डॉक्टर कार्यरत आहेत.

अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक (बोगस डॉक्टर) शोधन समित्या तीन स्तरांवर कार्यरत आहेत.यामध्ये जिल्हास्तरीय,तालुकास्तरीय ग्रामीण व शहरी पथकांचा समावेश आहे. जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात.सदस्य म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक,जिल्हा आरोग्य अधिकारी व सदस्य सचिव म्हणून उपजिल्हा पोलीस अधीक्षक (मुख्यालय) काम पाहतात.पथक प्रमुख म्हणून ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक व सदस्य म्हणून गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी असतात. मतीमध्ये संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी पथक प्रमुख असतात,तर गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी व संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किंवा पोलीस उपनिरीक्षक सदस्य म्हणून काम करतात.शहरी समितीमध्ये धाराशिव शहरासाठी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक व इतर तालुक्यांसाठी संबंधित तालुक्याचे वैद्यकीय अधीक्षक पथक प्रमुख असतात.नगर परिषद/नगर पंचायतचे मुख्याधिकारी सदस्य तर संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किंवा पोलीस उपनिरीक्षक सदस्य म्हणून काम करतात.

या बैठकीत बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम,१९६१ व भारतीय न्याय संहिता,२००३ अंतर्गत गुन्हे नोंदविण्याचे आदेश देण्यात आले. यामध्ये कलम ३३ व ३३(अ) नुसार शासन प्राधिकृत वैद्यकीय परिषदेची नोंदणी नसताना वैद्यकीय व्यवसाय करणे, रुग्णालय,दवाखाना किंवा क्लिनिक चालवणे; कलम ३६ नुसार अनधिकृतपणे पदवी,उपाधी किंवा पदविका वापरणे; कलम ३८ नुसार सदर गुन्हे दखलपात्र व अजामिनपात्र असणे,तसेच भा.न्या.स.२००३ मधील कलम ३१८(४), ३१९(२), ३१९(४), ३३६(२) व ३४० अंतर्गत फसवणूक,तोतयागिरी,बनावट कागदपत्रे तयार करणे,तसेच औषध आणि जादूटोणा (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम,१९५४ अंतर्गत कारवाई करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# अलमप्रभूंची टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक; भक्तांच्या मुखी जयघोष



भूम (प्रतिनिधी)- श्री क्षेत्र अलमप्रभू यात्रेच्या चौथ्या दिवशी परंपरेनुसार अलमप्रभूंची सिंहावरून दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सिंहारूढ अलमप्रभूंच्या दर्शनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. चौथ्या दिवशी ग्रामीण भागातील भाविकांसह माहेरवाशीण लेकी, तसेच पुणे, मुंबई आदी ठिकाणी नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले भाविक मोठ्या संख्येने यात्रेसाठी दाखल झाले होते. त्यामुळे शहरात दिवसभर गर्दीचे वातावरण पाहायला मिळाले. मिरवणुकीदरम्यान पारंपरिक वाद्यांचा गजर, टाळ-मृदंगाच्या निनादात जयघोष सुरू होता. ठिकठिकाणी भाविकांनी फुलांची उधळण करत अलमप्रभूंचे स्वागत केले. मिरवणूक पाहण्यासाठी शहरासह परिसरातील गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी नगराध्यक्ष संजय गाढवे यांनी यात्रेच्या तिसऱ्या दिवशी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सहभागी होत अलमप्रभूंचे पूजन करून दर्शन घेतले व भाविकांना यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी ड. संजय शाळू, शंकर गाढवे, आबा गाढवे, माजी नगरसेवक रोहन जाधव, माजी नगरसेवक धनंजय मस्कर, सुनील थोरात, चंद्रकांत गरड यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. श्री अलमप्रभू यात्रेची शंभर वर्षांची परंपरा, सर्वधर्म समभावाची जपणूक श्री अलमप्रभू यात्रेला शनिवार दि. १३ पासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी श्रींची रथामधून मिरवणूक काढण्यात आली . दुसऱ्या दिवशी रविवार काळविटावरून, तर तिसऱ्या दिवशी सोमवार दि. १५ रोजी सिंहावरून श्रींची मिरवणूक काढण्यात आली . ही परंपरा शंभर वर्षांहून अधिक काळापासून सुरू असल्याची माहिती पुजारी मधुकर भारती यांनी दिली. दरम्यान, श्री म्हणजे श्रीदत्तगुरू असून श्री दत्तगुरूंचे वाहन काळवीट आहे. त्यामुळे धार्मिक परंपरेनुसार यात्रेच्या दुसऱ्या दिवशी श्रींची मिरवणूक काळविटावरून काढली. या दिवशीची मिरवणूक विशेष महत्त्वाची मानली जाते.

खेळणीच्या दुकानांवर गर्दी यात्रेत विविध मनोरंजनात्मक पाळणे, खेळणी तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचाच उत्साह दिसून येत होता. रात्री उशिरापर्यंत यात्रास्थळी वर्दळ कायम असून, संपूर्ण भूम शहर भक्ती, उत्साह आणि आनंदाच्या वातावरणात न्हाऊन निघाले होते.

# शहापूर शाळेतील प्राथमिक शिक्षक श्री.सोनवणे यांचे स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य तालुक्यात प्रथम



जळकोट (विजय पिसे)- दिनांक १६ /१२/२०२५ रोजी गटशिक्षण कार्यालय पंचायत समिती तुळजापूर व नरेंद्र आर्य विद्यालय अपसिंगा ता.तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा शहापूर तालुका तुळजापूर येथील उपक्रमशी प्राथमिक शिक्षक श्री. सोनवणे दयानंद नामदेव यांच्या स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याचा प्रथम क्रमांक आला असून जिल्ह्य स्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.गणित विषयावर आधारीत तयार केलेल्या शै.साहित्याची जिल्हा स्तरीय स्पर्धे साठी निवड झाल्याबद्दल गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, गटशिक्षणाधिकारी अर्जून जाधव, नळदूर्ग बीट च्या शिक्षण विस्तार अधिकारी सौ.शोभा राऊत मॅडम, केंद्र प्रमुख राहूल जाधव, सत्तेश्वर जाधव, मुख्याध्यापक सचिन कुमार ढेपे,शिक्षक,शा.व्य.समिती अध्यक्ष, सदस्य,पालक व ग्रामस्थ यांनी अभिनंदन करुन पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मयत महिलेच्या नातेवाईकांना आवाहन

धाराशिव (जिमाका) पोलिस स्टेशन धाराशिव( ग्रामीण) येथील स्टेशन डायरी नोंद झालेल्या मयत श्रीमती लक्ष्मी खंडू आडसूळ.(वय ६७ वर्ष) रा.येडशी ता.जि. धाराशिव यांचा १४ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालय धाराशिव येथे उपचार घेत असताना मृत्यू झाला.

जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना नमूद महिलेच्या नातेवाईकांचा शोध होण्यासाठी वायरलेस मेसेस केला आहे. मयत महिलेचे कोणीही नातेवाईक न आल्याने तिच्या प्रेताचे शवविच्छेदन करून प्रेत जिल्हा रुग्णालय धाराशिव येथे शीत शवगृहात ठेवले आहे. मयत महिलेचे वारस अथवा नातेवाईक यांना आवाहन करण्यात येते की,मयत महिलेचे प्रेत अंत्यविधीसाठी घेऊन जावे. अन्यथा त्या मयत महिलेवर कायदेशीर पद्धतीने अंत्यविधी करण्यात येईल. असे पोलीस स्टेशन (ग्रामीण) यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र शक्तीपीठ एक्स्प्रेस-वे प्रकल्पाची पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणी २३ डिसेंबरला

धाराशिव (जिमाका)एमएसआरडीसी (MSRDC) मार्फत राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (पॅकेज-II) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे.ही सुनावणी मंगळवार,दि.२३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे होणार आहे.

या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) कडून प्राप्त पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EI-) अहवाल तसेच Executive Summary मधील सविस्तर माहिती संबंधित सर्व गावांमध्ये ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आली आहे.त्यामुळे प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक परिणाम नागरिकांना समजून घेणे सुलभ झाले आहे.

या प्रकल्पांतर्गत धाराशिव तालुक्यातील नितळी, घुगी, लासोना, सांगवी, कामेगाव, चिखली, महालिंगी, बरमगाव बु.,मेडसिंगा,धाराशिव ग्रामीण, देवळाली, शेकापूर, गावसुद, वरवंटी, पोहनेर, बेगडा व सुर्डी या गावांचा समावेश आहे.या गावांतील प्रकल्पग्रस्त व नागरिकांनी प्रकल्पाबाबतच्या आपल्या लेखी सूचना,मते व आक्षेप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय,लातूर तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे तात्काळ सादर करावेत,असे आवाहन करण्यात आले आहे.

या लोकसुनावणीदरम्यान नागरिकांना आपल्या समस्या,सूचना व भूमिका मांडण्याची संधी मिळणार असून त्या नोंदी अंतिम निर्णय प्रक्रियेसाठी विचारात घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवावा,असे आवाहन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उप प्रादेशिक कार्यालय लातूरचे सब रिजनल ऑफिसर यांनी केले आहे.

# नळदुर्गमध्ये येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोषः रविवारी चौथ्या खेट्याला भाविकांची गर्दी,

नळदुर्ग येळकोट, येळकोट जय मल्हारचा गजर करत भाविकांनी नळदुर्ग (मैलारपूर) येथे रविवारी चौथ्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

पावणेदोन महिन्याच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देव श्रीक्षेत्र मैलारपूर येथील खंडोबा मंदिरात आल्यानंतर याठिकाणी दर रविवारी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. रविवारी चौथ्या खेट्याला भल्या पहाटेपासूनच भाविकांनी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मैलारपुरात मोठी गर्दी केली होती. या वेळी देवाला दंडवत घालणे, बाशिंग चढवणे, देवाला नैवेद्य दाखविणे यासह विविध नवस फेडताना भाविक दिसून येत होते. त्याचबरोबर मोठया प्रमाणात भाविकांकडून मंदिरावर खोबरे आणि भंडारा उधळले जात होते.

यावर्षी श्रीक्षेत्र मैलारपूर येथे २ ते ४ जानेवारीदरम्यान श्री खंडोबाची यात्रा भरणार आहे. यात्रा कालावधीत याठिकाणी महाराष्ट्रासह आंध्र, कर्नाटक व तेलंगणा राज्यातील पाच ते सहा लाख भाविक उपस्थिती लावतात. यात्रेपूर्वी दर रविवारी याठिकाणी एक प्रकारे यात्राच भरते. नळदुर्ग शहर तसेच परिसरातील भाविक श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी याठिकाणी मोठ्या संख्येने येतात. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर रविवारी याठिकाणी भाविकांसाठी अन्नदान सुरू केले जाते.

# ५ एच.पी. क्षमतेचा अंदाजे १,२०,००० किंमतीची मोटर अज्ञाताने चोरली

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी - प्रकाश गोपिनाथ पवार, वय ३२ वर्षे, रा. धारुर ता. जि. धाराशिव यांनी अभय मनोहर गायकवाड रा. खामसवाडी ता. जि. धाराशिव यांची बटईने केलेल्या धारुर शिवारातील शेत गट नं ४०९ मधील सामाईक विहीरीवरील के. एस.बी. सोलार कंपनीचा ५ एच.पी. क्षमतेचा अंदाजे १,२०,००० किंमतीची मोटर अज्ञात व्यक्तीने दि.०८.१२.२०२५ रोजी ०४.०० वा. सु. ते दि.१२.१२.२०२५ रोजी १२.०० वा. सु. चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रकाश पवार यांनी दि.१४.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## चर्चा युती-आघाडीची.....

राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुका प्रदीर्घ कालावधीनंतर जाहिर झाल्या आहेत. त्यामुळे महानगरात आता उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. अनेक काळ हा प्रशासकिय असल्याने जनतेचे प्रतिनिधीत्व नव्हते. आता अनेकास नगरसेवक व्हावे, यासाठी उत्स्युकता दिसून येत आहे. गत सहा महीण्यापासून उत्स्युक कार्यकर्ते गल्ली-बोळात दिसत आहेत. राज्यातील सर्वात महत्वाची निवडणुक म्हणून मुंबईकडे पाहिले जाते. मुंबई महानगरपालिका ही आज पर्यंत शिवसेनेकडे अधिक काळ राहीलेली आहे. मुंबईत मराठी माणसाचे वर्चस्व होते. मोठ्या प्रमाणात गिरण्या व गिरणी कामगार होते. कालांतराने गिरण्या बंद पडत गेल्या. कामगार नेते व कारगाराच्या संघर्षात गिरणी मालकांनी जागा बिल्डर्सला विकून ते परदेशात गेले. आजही मोठ-मोठ्या मीलच्या जागा व त्यावर मोठे मॉलने बांधकाम पाहावयास मिळत आहे. मुंबई महाराष्ट्रातच राहावी यासाठी मराठी माणसाचे बलिदान, हौतात्मे वाया जाऊ नये यासाठी मराठी माणसाचे योगदान कदापी विसरता येऊ नये. मराठी माणसाला जे संरक्षण दिले ते हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी! तरीही हाताला काम मितळण्यासाठी युपी व बिहारींची संख्या कमी नाही. राज्यात जेवढ्या महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत त्यात सर्वात्र चर्चा व लक्ष मुंबई महानगरपालिकडे असणार आहे. जसे उद्धव व राज ठाकरे जवळ येणार तसे  एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस एकत्र येणार हे जवळपास निश्चित समजले जाते. राज ठाकरे यांच्याबाबत सहसा कोणी मत व्यक्त करीत नाही मात्र उद्धव ठाकरे यांच्या कडून संजय राऊत यांचे वक्तव्य या बाबत केले जात आहे. याला दोघाकडून प्रतिसाद मिळत नसला तरी काही तरी शिजत आहे हे मात्र नक्की! त्यामुळे राज्यात महानगरपहिलकाच्या अगोदर राज्यातील नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाला जाहिर होणार आहे. याचा परिणाम महानगरपालिकेच्या निवडणुकीवर होणार आहे हे नक्की. सुरवातीला युती का आघाडीत एकमत होणे आवश्यक आहे. जसे राष्ट्रवादीचे अजित पवार यांचे कार्यकर्ते स्वतंत्र निवडणुक लढवावी या विचारात आहेत. या निवडणुकीचे पडसाद दिल्लीत दिसून येत आहे. खा. सुप्रिया सुळे यांचा दोन्ही राष्ट्रवादी एक होईल असा सुर नुकताच दिसून आला. पुण्यात तर राष्ट्रवादी स्वबळावर लढणार आहे हे जवळपास निश्चित आहे. काही झाले तरी राज्यातील प्रमुख शहरात ही निवडणुक होत आहे. आपल्याच पक्षाचे वर्चस्व राहावे असे सर्वांना वाटत आहे. राज्यातील काँग्रेस पक्षाला मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. अजून राज्य स्तरावर हालचाली दिसून येत नाहीत. मुळात अनेक दिग्गज पक्षांतर करीत आहेत. काँग्रेसमधील निष्ठावंताची गळती ही पक्षासाठी हानीकारक ठरणारी आहे. राज्यात काँग्रेसने राज ठाकरे यांच्या सोबत जाण्याचा नकार दिला आहे. उद्धव ठाकरे जर राज ठाकरे यांच्या मनसे सोबत गेले तर महाआघाडीतून बाहेर पडू असा ईशारा दिला आहे. त्याच बरोबर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आम्ही काँग्रेसला सोबत घेणार नाही असे जाहिर केले आहे. याचा अर्थ काँग्रस ही आलिप्त राहणार म्हणजे स्वतंत्र लढणार यात शंका घेण्याचे कारण नाही. काँग्रेस पक्षातील जी गळती प्रक्रिया चालू आहे ती रोखली पाहिजे. तसे पाहिले तर बुडत्या जहाज मध्ये कोण बसणार? सध्याला अजित पवार यांचे सावध पावले पडत आहेत. कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. कोणतेही मत व्यक्त केले नाही. जसे  एकनाथ शिंदे यांनी भाजपासोबत म्हणजे देवेंद्र फडणवीस सोबत युती करणार, निवडणुक लढविणार हे जाहिर केले आहे. मुंबई-ठाणे परिसरात एकनाथ शिंदे वजन आहे. अनेक काळ मुंबईत काम केले आहे. मनसेचे राज व उद्धव ठाकरे हे मुंबईचे असल्याने मुंबई महानगरपाहिलकेची निवडणुक ही चर्चेची ठरणारी आहे. पुण्यासह छत्रपतीसंभाजीनगरातील निवडणुका सुद्धा चर्चेची ठरणारी आहे. आता केवळ महायुती का महाआघाडीत कोण-कोणते पक्ष एकत्र येणार यावर चर्चा दिसून येते. ज्यावेळी या बाबत अंतिम निर्णय होईल त्याच वेळी कार्यकर्ते कामाला लागतील. सध्याला एक बाब समोर येते ती म्हणजे पक्षांतर करणाऱ्याची संख्येत वाढ! मुळात इकडून तिकडे कार्यकर्ते पक्षांतर करीत आहेत. त्याची ताकद किंवा त्यांना मानणारा वर्ग किती आहे याचा विचार केला पाहिजे. शंभरजन मागे नसणारे या पक्षातून त्या पक्षात जात आहेत. त्यांची स्वक्षमाता कमी असल्याने इतर पक्षाचा आधार घेत आहेत. मुळात चालू घडील पक्षांतर करणारे अधिक दिसून येतात. त्यांच्या पाठीशी किती मतदार आहेत. किती मानणारे आहेत. याचा अभ्यास केला पाहिजे. काही जन सतत पक्ष बदलणारे आहेत. मतदार नागरिकांचा हीत जोणासणारे नाहीत तर स्वस्वार्थपनाने आपलीच झोळी भरून घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे हे जनतेला सुद्धा कळाले आहे. राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुका तोंडावर असताना किती जणांनी पक्षांतर केले  आहे किंवा त्यांच्या पाठीशी मोठी ताकद आहे का? याचा विचार पक्ष प्रवेश देणाऱ्यांनी केला पाहिजे. जे पक्ष बदलू आहेत ते ज्या पक्षात जातात त्यांचे तरी भले करतील का?  जे निष्ठावंत आहेत ते कायम स्वरुपी पक्षात कार्यरत दिसून येत आहेत. त्यांना पक्षातील मोठ्या नेत्यांनी लिफ्ट दिली पाहीजे. आज पक्ष बदलणारे अजून भरपूर आहेत. याकडे न पाहाता जनताच त्यांच्याकडे पाहुन त्यांची पुर्वीचीच जागा दाखविणार आहे हे नक्की! राज्यात सर्वात महत्वाची निवडणुक मुंबई महानगरपालिकेची आहे. इतरही महानगरपालिकेची निवडणुक महत्वाच्या आहेत. आता जनता कोणाच्या बाजूने जाईल हे सांगता येत नाही. ठाकरे बंधू एकत्र आलेतरी चर्चा होणार आहे. आताच कसे एकत्र आले! ज्यावेळी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते त्यावेळी मनसेला जो त्रास सहन करावा हे विसरतील असे वाटत नाही. त्यामुळे संजय राऊत बोलतात हेच खरे धरावे का? हा विचार मतदाराच्यामनात घोंगावत आहे. ज्यावेळी नगरपालिकेच्या निवडणुक निकाला समोर येतील यावरून महानगरपालिका बाबत बऱ्याच बाबी समोर येणार आहेत. आता केवळ कोण कोणासोबत जाणार आहे. कोणाची महायुती व महाविकास आघाडीत समावेश होणार याकडेच लक्ष राहाणार आहे. केवळ निवडणुका समोर ठेऊन ठाकरे बंधू एकत्र येणार असतील तर हे जनतेला कळून येणार आहे. याचा परिणामही दिसून येणार आहे. सध्याला कोण-कोणत्या पक्षात जाणार आहे व गेला आहे एवढीच चर्चा दिसून येत आहे.

# माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा !








मराठवाडा संतांची, वीरांची भूमी आहे. याच भूमीतील नांदेड जिल्ह्यात माळेगाव आहे. लोहा तालुक्यातील या गावात मोठी यात्रा भरते. ही यात्रा मार्गशीर्ष अमावास्येला सुरू होते. दक्षिण भारतात ही यात्रा अत्यंत प्रसिद्ध आहे. माळेगाव केवळ धार्मिक स्थळ नाही. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारे मोठे व्यापारी केंद्र आहे. या यात्रेला आजपासून (ता. १८ ते २५ डिसेंबर) सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने या यात्रेवर प्रकाश टाकणारा हा लेख. माळेगाव यात्रेला जवळपास चार शतकांची परंपरा आहे. मोगल, निजाम काळापासून या यात्रेला अनन्य साधारण महत्त्व आहे. ऐतिहासिक काळापासून माळेगाव घोड्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. आजही तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील व्यापारी येथे येतात. या ठिकाणी महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाचे देखणे, सुंदर असे मंदिर आहे. माळेगाव यात्रा म्हणजे लोककलांचे माहेरघरच. येथे कलगी-तुरा, वाघ्या-मुरळी, गोंधळ आणि भारूड सादर होतात. तमाशा, लावणी येथील मुख्य आकर्षण असते. नामांकित तमाशा फडांची जुगलबंदी येथे रंगते. तमाशासोबतच मौत का कुआँ सारखे प्रकारही येथे दिसतात. इतर यात्रांमध्ये प्रामुख्याने फक्त देवदर्शन असते. पण माळेगाव यात्रा वेगळी आहे. येथे कृषी प्रदर्शन आणि कुस्त्यांची दंगल पाहायला मिळते. पशु प्रदर्शन या यात्रेचे हृदय आहे. येथे हजारो जनावरांची खरेदी-विक्री होते. राजस्थानच्या पुष्कर मेळ्यानंतर घोड्यांच्या व्यापारासाठी ही दुसरी मोठी बाजारपेठ आहे. यात्रेत सर्वधर्मीय लोक आनंदाने सहभागी होतात. ही यात्रा म्हणजे उत्तम, असे सामाजिक सलोख्याचे प्रतीकच आहे. माळेगाव यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाच ते सात दिवसांतच येथे कोट्यवधींची उलाढाल होते. चेतक, मारवाडी, पंजाबी अशा उच्च जातीचे घोडे विक्रीला येतात. या घोड्यांची खरेदी-विक्री किंमत चकित करणारी असते. यासह येथे गाढवांचीही मोठी बाजारपेठ भरते. वीटभट्टी व्यावसायिक आणि परराज्यातील व्यापारी येथे गाढवे खरेदी करतात. याशिवाय उंट, बैल, गायी आणि शेळ्या-मेंढ्यांचीही विक्री होते. कृषी अवजारे आणि खाद्यपदार्थांचीही मोठी उलाढाल होते. अडचणीच्या काळात ही यात्रा शेतकऱ्याला आधार देते. पशुधन विकून आलेला पैसा शेतीसाठी वापरला जातो. यात्रेत शेतकऱ्यांना नवीन बियाणे आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळते. तसेच यात्रेतून स्थानिक मजुरांना रोजगार मिळतो. पूर्वी यात्रेत कृषी विषयक वस्तूंची देवाण-घेवाण होत असे. आता रोखीने आणि युपीआयद्वारे व्यवहार होतात. पूर्वी बैलगाडीतून येणारे भाविक चारचाकी गाड्यांमधून येतात.

माळेगावची ही यात्रा केवळ उत्सव नाही. ती ग्रामीण संस्कृतीची एक प्रयोगशाळा आहे. आधुनिकीकरणाच्या काळातही यात्रेने आपली ओळख जपली आहे. हजारो हातांना काम देणारी ही यात्रा खऱ्या अर्थाने वैभवशाली अशीच आहे.

**– डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# दर्शवेळा अमावस्या: ग्रामसंस्कृती आणि शेतीचे प्रतीक

**माती म्हणजे काळ्या आईची ममता,**
**रब्बीच्या हिरव्या वस्त्रात शिवारात रमते;**
**शेतशिवारात पंगत, आनंदाचा सडा पडे,**
**दर्शवेळा अमावस्या, संस्कृतीचा अतूट बंध जडे.**

''शिवार सजले हिरव्यागार पिकांनी, मन हरखले निसर्गाच्या सौदर्याने! जेव्हा मार्गशीर्ष अमावस्येच्या थंडीत, शेतकरी कुटुंब काळ्या आईच्या चरणी नतमस्तक होते, तेव्हा साजरा होतोवेळाअमावस्या. हा केवळ एक सण नाही, तर निसर्गाप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता, सामाजिक समरसतेचे दर्शन घडवणारे वनभोजन आणि पूर्वजांनी जपलेला समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे. मराठवाडा आणि कर्नाटक सीमाभागाचे वैभव असलेला हा उत्सव, मातीशी असलेले आपले नाते अधिक घट्ट करतो. हा सण लातूर जिल्हयात मोठया उत्साहात साजरा होतो''

भारत हा कृषीप्रधान देश आहे. येथील ग्रामीण जीवन, सण-उत्सव आणि अर्थकारण शतकानुशतके शेतीशी जोडलेले आहे. शेती हा केवळ व्यवसाय नसून, जीवनपद्धतीचा केंद्रबिंदू आहे. याच कृषी संस्कृतीतून निर्माण झालेला एक मनोहारी लोकसण म्हणजे दर्शवेळा अमावस्या. येळवस किंवा वेळाअमावस्या या नावांनी ओळखला जाणारा हा उत्सव शेतकरी आणि निसर्ग यांच्यातील कृतज्ञतापूर्ण नात्याचे जिवंत प्रतीक आहे.

उत्सवाचे स्वरूप आणि भौगोलिक व्याप्ती पाहता दर्शवेळा अमावस्या प्रामुख्याने मराठवाडा (धाराशिव, लातूर, बीड, सोलापूर) आणि कर्नाटक सीमाभागात (गुलबर्गा, बीदर) मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यातील अमावस्येला हा सण येतो. या दिवशी शेतकरी आपल्या काळ्या आईचीम्हणजेच धरणीमातेचीपूजा करतात. खरीप हंगाम संपून रब्बीतील गहू, हरभरा, ज्वारी, करडई आणि सूर्यफूल ही पिके हिरवीगार डोलू लागलेली असतात. या पिकांच्या भरघोस उत्पादनासाठी आणि निसर्गाची कृपादृष्टी कायम राहावी, यासाठी देवाकडे प्रार्थना केली जाते. शेतशिवारात सामूहिक वनभोजन आयोजित करण्याची या सणाची मोठी परंपरा आहे.

या सणाच्या नावाचा उगम कर्नाटकात असल्याचे मानले जाते. कन्नड भाषेत याला येळ्ळ अमावस्या म्हणतात, ज्याचा अर्थ पेरणीनंतर येणारी सातवी अमावस्या असा होतो. या शब्दाचा अपभ्रंश होऊन महाराष्ट्रात येळवस किंवा वेळा अमावस्या हे शब्द रूढ झाले.

निसर्गाशी ऋणानुबंध आणि आरोग्यशास्त्रा प्रमाणे वेळा अमावस्या हा केवळ धार्मिक विधी नसून, शेतकरी आणि निसर्गाचे अतूट नाते दर्शवतो. भूमातेने दिलेल्या धनधान्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, हा या पूजेचा मुख्य उद्देश असतो. ऊन, वारा, पाऊस या निसर्गशक्तींसमोर नतमस्तक होण्याची ही एक विनम्र पद्धत आहे.

मार्गशीर्ष महिना म्हणजे थंडीचा कडाका आयुर्वेदशास्त्रानुसार या काळात शरीराला उष्णता देणारे आणि स्निग्ध पदार्थ सेवन करणे आवश्यक असते. हिवाळ्यात पचनशक्ती उत्तम असल्याने, या सणात बनवले जाणारे पारंपरिक पदार्थ आरोग्याला ऊर्जा आणि पोषण देतात.

**सामाजिक समरसतेचा संदेश**

या सणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक समानता. या दिवशी शेतकरी आपले शेजारी, मित्र, नातेवाईक आणि अगदी अपरिचित वाटसरूंनाही जेवणाचे आग्रहाचे निमंत्रण देतात. जात, धर्म किंवा आर्थिक स्थितीचा कोणताही भेद न बाळगता सर्वजण एकाच पंगतीत बसून वनभोजनाचा आनंद घेतात. यामुळे हा सण माणुसकी आणि एकोपा यांचा संदेश देतो.

**सणाची तयारी आणि पूजाविधी**

दर्शवेळा अमावस्येच्या दिवशी शहरे ओस पडतात आणि शेते गजबजून जातात. शेतकरी कुटुंबे पहाटेच बैलगाड्या किंवा ट्रॅक्टरमधून शेताकडे रवाना होतात. आदल्या दिवशी कडब्याच्या पेंढ्यांपासून शेतात एक तात्पुरती खोप (झोपडी) तयार केली जाते. या खोपीत मातीपासून बनवलेल्या पांडवांची (पाच पांडव आणि सहावी द्रौपदी) स्थापना केली जाते. या मूर्तींना काव आणि चुना लावून रंगवले जाते. ऊस, ज्वारीचे ताट, फुले आणि आंब्याच्या पानांनी ही खोप सजवली जाते.

पांडवांना नैवेद्य दाखवल्यानंतर चर शिंपडणे हा महत्त्वाचा विधी पार पडतो. यात भज्जी, उंडे आणि आंबिल हे पदार्थ पिकांवर आणि बांधावर प्रतीकात्मक स्वरूपात शिंपडले जातात. 'हरभला जो भगतरा हर हर महादेव' किंवा 'ओलघे, ओलघे सालम पोलगे'(तुम्ही सुखी राहा, समृद्ध व्हा) असा जयघोष करत प्रदक्षिणा घातल्या जातात.

वनभोजन आणि अस्सल ग्रामीण मेजवानी

पूजा संपन्न झाल्यावर हिरव्यागार शिवारात वनभोजनाची पंगत बसते. निसर्गाच्या सान्निध्यात जेवण्याचा हा अनुभव शहरातील पार्ट्यांपेक्षा अधिक सुखद असतो. या मेजवानीचे पदार्थ केवळ चविष्ट नसून पौष्टिक असतात:

**१. भज्जी आणि उंडे:** सुमारे सोळा प्रकारच्या पालेभाज्या आणि शेंगा (वाटाणा, तूर, मेथी, वाल, गाजर, चिंच) एकत्र करून ही भज्जी बनवली जाते. बाजरीच्या पिठाचे उकडलेले गोळे म्हणजे  हे फायबरने समृद्ध असतात.

**२. आंबिल:** हे या सणाचे खास आकर्षण आहे. ज्वारीचे पीठ ताकात भिजवून, रात्रभर आंबवून त्यात आले, लसूण आणि कढीपत्त्याची फोडणी दिली जाते. हे पेय पचनास उत्तम आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे असते.

**३. इतर पदार्थ:** बाजरीची भाकरी, गुळ-तूप घातलेली गव्हाची खीर (हुग्गी), धपाटे आणि खिचडा हे पदार्थ मातीच्या भांड्यांतून (बिंदगी) वाढले जातात, जे ग्रामीण साधेपणाचे दर्शन घडवतात.

**मनोरंजन आणि परंपरा**

जेवणानंतर स्त्रियांच्या गप्पा आणि पुरुषांचे मैदानी खेळ किंवा पत्ते खेळणे रंगते. काही ठिकाणी पतंग उडवण्याचीही प्रथा आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख हे कितीही व्यस्त असले, तरी दरवर्षी लातूरच्या बाभळगावला येऊन सहकुटुंब हा सण साजरा करत असत. यामुळे या उत्सवाला सामाजिक आणि राजकीय स्तरावर मोठी ओळख मिळाली.

दर्शवेळा अमावस्या हा कृषी संस्कृतीचा आत्मा आहे. यात अर्थशास्त्र (पीक संरक्षण), आरोग्यशास्त्र (ऋतू नुसार आहार) आणि सामाजिक समरसता यांचा सुरेख संगम आढळतो. हा सण निसर्गाला हानी न पोहोचवता कृतज्ञता व्यक्त करण्याची शिकवण देतो. नव्या पिढीने या परंपरेचा अनुभव घ्यायला हवा, कारण यात केवळ खाद्यसंस्कृती नाही, तर एकता आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दडलेला आहे.

**मार्गशीर्ष मासी येळवस आली,**
**रानोमाळी सारी हिरवी न्हाली!**
**काळ्या आईचे ऋण फेडण्याला,**
**दर्शवेळा अमावस्या शेतात सजली.**
**वेळ अमावस्या, तू ये पुन्हा पुन्हा,**
**बळीराजावर असो निसर्गाची कृपा!**



**– राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**– मो. ९८९०५७७१२८**

## वेळ-अमावस्या उत्सव परंपरा कृषीसंस्कृती, परंपरा आणि सामुदायिक एकोपा यांचा अनोखा संगम

कर्नाटकमहाराष्ट्र सीमाभाग तसेच मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत वेळ-अमावस्या हा पारंपरिक व धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस १९ डिसेंबर रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी मार्गशीर्ष/पौष महिन्यातील अमावस्येला ग्रामीण संस्कृतीत कुलदैवत पूजन, निसर्गपूजन व कृषीरक्षण यांचा सुंदर संगम साधला जातो.

विशेषतः कलबुर्गी, बीदर, सोलापूर, लातूर, भालकी, उदगीर, निलंगा, औसा इत्यादी परिसरात हा उत्सव अत्यंत श्रद्धेने पाळला जातो. या दिवसाच्या पूर्वतयारीसाठी पहिल्या दिवशी विविध पारंपरिक पदार्थांची तयारी केली जाते. भज्जी, आंबील, रोडगे, (विशिष्ट प्रकारची भाकर), खिचडी, वरण-फळं (पिठापासून उकडलेले पदार्थ), कानवले, खीर, पिठापासून बनवलेले दिवे असे अनेक विशिष्ट पदार्थ तयार करून पूजनासाठी सज्जता केली जाते. अनेक शेतकरी आपल्या शेतामध्ये कडब्यापासून तयार केलेली 'कोपी' (एक प्रकारची झोपडी) उभारून कोपीवर शाल पांघरून पूजनाची व्यवस्था करतात.

येणाऱ्या दिवशी सकाळी गावातील सर्वजण आपापल्या शेतात जातात. तेथे महालक्ष्मीचे पूजन करून निवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर सर्वजण एकत्र बसून पारंपरिक पदार्थांचे भोजन करतात. कोपीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला आदराने जेवण घालण्याची परंपरा आजही मोठ्या जिव्हाळ्याने पाळली जाते. झोके खेळणे, पतंग उडवणे आदी पारंपरिक खेळांमुळे शेतशिवार आनंदाने फुलून जाते.

संध्याकाळी साधारण सहा वाजल्यानंतर शाल पांघरून सजवलेली 'डाल' (शिंदी झाडापासून विणलेली मोठी टोपली) डोक्यावर घेऊन ग्रामस्थ गावाकडे प्रस्थान करतात. गावातील महालक्ष्मीचे सामूहिक पूजन झाल्यानंतर सर्वजण आपापल्या घरी परततात. महिलावर्ग, तरुणाई व ज्येष्ठ नागरिकांमध्ये या दिवशी विशेष उत्साह पाहायला मिळतो.

पवित्र मानल्या जाणाऱ्या 'वेळ' वनस्पतीचे पूजन, घरगुती देवघरात दीपदान, हळद-कुंकू, ओटी-भरवणी अशा पारंपरिक प्रथांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जातो. महिलांमध्ये एकमेकींना कुंकू लावून मंगलाशीर्वाद देण्याची परंपरा या दिवशी विशेष रंगतदार होते.

वेळ-अमावस्या हा केवळ धार्मिक दिवस नसून गावकऱ्यांना एकत्र आणणारा, परंपरा जपणारा, आध्यात्मिक चिंतनाचा आणि सामाजिक एकता दृढ करणारा महत्त्वाचा उत्सव आहे. निसर्गाशी असलेले नाते, मातृशक्तीचे पूजन आणि पितृपरंपरेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, आणि संस्कृती टिकविण्याच्या दृष्टीने हा दिवस ग्रामीण संस्कृतीचा वारसा ठरत आहे.



**–अशोक गुरनाळे**

---

## कॉलेज तरुणी आणि परदेशाची ओढ : निर्णय की दबाव?

आज कॉलेजच्या पायऱ्यांवर, वसतिगृहांच्या खोलीत किंवा मैत्रिणींच्या गप्पांमध्ये एक प्रश्न वारंवार डोकं वर काढतोआपण परदेशात जायचं का? हा प्रश्न केवळ करिअरच्या संधीपुरता मर्यादित नाही; तो आजच्या तरुणींच्या अस्वस्थतेचा, अपेक्षांचा आणि वास्तवाशी होणाऱ्या संघर्षाचा आरसा आहे. शिक्षण घेतलेली, महत्त्वाकांक्षी आणि आत्मनिर्भर होऊ पाहणारी तरुणी स्वतःच्या राज्यातच भविष्य शोधताना साशंक का होते, हा खरा विचाराचा मुद्दा आहे.

महाराष्ट्रात मुली शिकत आहेत, पुढे येत आहेत, पदव्या मिळवत आहेतहे चित्र समाधानकारक आहे. पण शिक्षणानंतरचा टप्पा अनेक तरुणींसाठी अनिश्चिततेचा ठरतो. नोकरी मिळते, पण ती टिकेल का याची खात्री नसते. पगार असतो, पण तो स्वावलंबनासाठी पुरेसा वाटत नाही. करिअरच्या प्रगतीचा मार्ग अस्पष्ट असतो. त्यामुळे ''इथे थांबून आपण काय मिळवणार?'' हा प्रश्न मनात येतो आणि परदेशाचा विचार आकार घ्यायला लागतो.

ग्रामीण व निमशहरी भागातील तरुणींसाठी ही स्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. शिक्षणासाठी शहर गाठले, पण नोकरीच्या टप्प्यावर पुन्हा अनेक अडथळे उभे राहतात. राहण्याची सुरक्षितता, प्रवास, समाजाची नजर आणि घरच्या जबाबदाऱ्याया सगळ्यांचा भार एकट्या तरुणीवर येतो. अनेक वेळा करिअरपेक्षा ''घरची परिस्थिती'' जास्त महत्त्वाची ठरते. अशा वेळी परदेशातील स्पष्ट नियम, सुरक्षित वातावरण आणि व्यक्तिस्वातंत्र्य अधिक आकर्षक वाटते.


परदेशाकडे पाहण्यामागे फक्त आर्थिक कारणे नाहीत. तिथे काम करणाऱ्या महिलेला तिच्या क्षमतेनुसार वागणूक मिळते, असा विश्वास तरुणींमध्ये आहे. कामाच्या ठिकाणी नियम स्पष्ट असतात, वेळेचे बंधन पाळले जाते आणि कायदेशीर संरक्षणाची भावना असते. याउलट, आपल्या इथे अनेक तरुणींना अप्रत्यक्ष भेदभाव, संधी मिळवण्यासाठी लागणाऱ्या ओळखी आणि न सांगता येणाऱ्या अपेक्षा यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे करिअरची स्वप्ने इथे मर्यादित वाटू लागतात.

या प्रवाहाचे परिणाम समाजासाठी चिंताजनक आहेत. शिक्षित, संवेदनशील आणि सक्षम तरुणी बाहेर गेल्या तर स्थानिक समाजात नेतृत्वाची पोकळी निर्माण होते. कुटुंबांना भावनिक दुरावा सहन करावा लागतो. परदेशातील यशोगाथा मोठ्या प्रमाणावर ऐकू येतात; पण तिथले एकटेपण, मानसिक ताण, सांस्कृतिक संघर्ष आणि अपयशाची भीती यावर फारशी चर्चा होत नाही. प्रत्येकासाठी परदेश म्हणजे सुरक्षित मार्ग असेलच, असे नाही.

येथे प्रश्न शासनाचाही आहे आणि समाजाचाही. मुली शिकाव्यात, पुढे याव्यात असे आपण म्हणतो; पण त्या पुढे गेल्यावर त्यांच्यासाठी योग्य संधी, सुरक्षित वातावरण आणि सन्मानजनक वागणूक देण्यासाठी आपण किती तयार आहोत? कौशल्य विकास, स्थानिक रोजगार, महिला-सुरक्षित कार्यस्थळे आणि कामघर समतोल याबाबत ठोस पावले उचलली नाहीत, तर स्थलांतर हा पर्याय न राहता अपरिहार्य निर्णय ठरेल.


तरुणींनीही स्वप्न पाहताना वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. परदेश म्हणजे सगळ्या समस्यांवरचे उत्तर नाही. यश, संघर्ष आणि अपयशहे तिकडेही तितकेच खरे आहेत. मात्र निवड ही स्वतःच्या क्षमतेवर आणि इच्छेवर आधारित असावी, दबावातून नव्हे.

आज खरा प्रश्न असा आहे की महाराष्ट्र तरुणींना थांबवू शकतो का? त्यांना इथेच आपली ओळख घडवता येईल, असे वातावरण निर्माण करू शकतो का? जेव्हा तरुणींना स्वतःच्या राज्यातच सुरक्षित, सन्मानजनक आणि स्वावलंबी भविष्य दिसेल, तेव्हाच परदेशाची ओढ निर्णय राहीलपलायन नाही.




**– डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली जिल्हा रत्नागिरी**

# अति प्रमाणात पाव खाल्ल्याचे दुष्परिणाम



पाव हा रोजच्या आहाराचा भाग असला तरी त्याचे अति सेवन पचनाचे त्रास, वजनवाढ, रक्तातील साखर वाढणे आणि पोषणअभाव निर्माण करू शकते.
आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत पाव हा अनेकांचा रोजच्या आहारातील अविभाज्य भाग झाला आहे. वडा-पाव, भाजी-पाव, मिसळ-पाव किंवा फक्त चहा सोबत पाव, अशा अनेक स्वरूपांत पाव सहजपणे खाल्ला जातो. कमी किंमत, पटकन मिळणारा आणि पोट भरल्यासारखे वाटणारा हा पदार्थ अनेकांना सोयीचा वाटतो. मात्र, अति प्रम णात पाव खाल्ल्यास शरी- रावर होणारे दुष्परिणाम अनेकजण दुर्लक्षित करतात. सातत्याने आणि जास्त प्रमाणात पाव खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो.
रोज चवीने खाताय उहळलज्ञशप? वाढू शकतो पोटाच्या कॅन्सरचा धोका, डॉक्टरांनी दिला इशारा
पाव प्रामुख्याने मैद्यापासून बनवला जातो. मैदा हा परिष्कृत कार्बोहायड्रेट प्रकारात मोडतो. त्यामध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे अत्यंत कमी प्रमाणात असतात. त्यामुळे अति प्रमाणात पाव खाल्ल्यास पचनसंस्थेवर ताण येतो. अनेकांना गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता, पोट फुगणे यांसारख्या तक्रारी सुरू होतात. विशेषतः ज्यांची पचनशक्ती कमकुवत आहे, त्यांना हा त्रास अधिक जाणव- तो. पावामुळे वजन वाढण्याची शक्यताही मोठ्या प्रमाणात असते. मैद्यातील जास्त कार्बोहायड्रेट्स शरीरात साठवले जातात आणि ते चरबीमध्ये रूपांतरित होतात. रोज एकापेक्षा जास्त पाव खाल्ल्यास कॅलरीचे प्रमाण नकळत वाढते, ज्यामुळे लठ्ठपणा वाढू शकतो. वाढलेले वजन पुढे जाऊन मधुमेह (डायबेटीस), उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका वाढवू शकते.
पाव खाल्ल्यानंतर रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढते. त्यामुळे मधुमेह असलेल्या किंवा प्री-डायबेटीक अवस- थेतील व्यक्तींनी पावाचे सेवन मर्यादित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. सतत पाव खाल्ल्याने इन्सुलिनचा समतोल बिघडू शकतो आणि दीर्घकाळात डायबेटीसचा धोका वाढतो. पावामध्ये प्रथिने (प्रोटीन) आणि आवश्यक पोषक घटक फार कमी असतात. जर आहारात पावाचे प्रमाण जास्त आणि भाज्या, डाळी, फळे यांचे प्रम ाण कमी असेल, तर शरीराला आवश्यक पोषण मिळत नाही. यामुळे थकवा जाणवणे, कमजोरी, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे अशा समस्या उद्भवू शकतात. विशेषतः मुलं, तरुण आणि मेहनतीचे काम करणाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.अति पाव खाल्ल्याने त्वचे- वरही परिणाम दिसून येऊ शकतात. काही जणांमध्ये पिंपल्स, त्वचेचा निस्तेजपणा आणि सूज येण्यासारख्या समस्या वाढतात. मैद्यामुळे शरीरात सूज निर्माण करणाऱ्या प्रक्रियांना चालना मिळू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. मग उपाय काय? पाव पूर्णपणे बंद करणे आवश्यक नाही, पण प्रमाण राखणे महत्त्वाचे आहे. शक्य असल्यास ब्राउन ब्रेड किंवा मल्टीग्रेन ब्रेडचा पर्याय निवडावा. पाव खाताना त्यासोबत भरपूर भाज्या, उसळ, डाळी किंवा प्रथिनयुक्त पदार्थ घ्यावेत. रोजच्या आहारात फळे, हिरव्या भाज्या, संपूर्ण धान्यांचा समावेश केल्यास शरीर निरोगी राहते. नियमित व्यायाम आणि पाणी पिण्याची सवयही तितकीच आवश्यक आहे.विना वॅक्सिंग चेहऱ्यावरील सर्व केस होतील दूर, काचेसारखी चमकेल त्वचा; फक्त या ३ गोष्टी पिठात मिसळा आणि कमाल बघाथोडक्यात, पाव हा सोयीचा आणि चविष्ट असला तरी त्याचा अतिरेक आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. संतुलित आहार, योग्य प्रमाण आणि आरोग्याबाबत जागरूकता ठेवल्यासच स्वतःला दीर्घकाळ निरोगी ठेवता येईल.

# पुरुष-महिलांच्या कर्करोगावरील उपाययोजना



जगभरात दरवर्षी अंदाजे २० दशलक्ष लोक कर्करोगाला बळी पडतात. त्यापैकी १५ लाख लोक भारतातील आहेत. कर्करोग हा भारतात वेगाने वाढणारा आजार आहे, ज्यामुळे हजारो लोकांचा अकाली मृत्यू होतो. आता, एका नवीन अहवालात राजधानी दिल्लीचे भयानक चित्र समोर आले आहे.
केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने संसदेत दिलेल्या निवेदनानुसार, दिल्लीत तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण वर्षानुवर्षे वाढत आहे. दिल्लीत तोंडाच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये दरवर्षी ५.१ टक्क्यांनी वाढ होते. फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या प्रकरणांम ध्येही ४.९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तोंडाचा कर्करोग हा पुरुषांमध्ये सर्वात सामान्य कर्करोग आहे, तर स्तनाचा कर्करोग हा महिलांमध्ये सर्वात सामान्य कर्करोग आहे.
स्तन कर्करोगाच्या 'या' लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, खूप उशीर होण्यापूर्वी स्वतःला वाचवा
महिलांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्येही वाढ
अहवालात असेही उघड झाले आहे की महिलांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्येही वेगाने वाढ होत आहे. २०२३ मध्ये, महिलांमध्ये ६०४ फुफ्फुसाच्या कर्करोगाचे रुग्ण आढळून आले, २०२४ मध्ये ६४४ आणि २०२५ मध्ये ही संख्या ६८६ झाली. दरम्यान, पुरुषांमध्ये तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. २०२३ मध्ये २,४२९ फुफ्फुसाच्या कर्करोगाचे रुग्ण पुरुष होते, तर २०२४ मध्ये २,५६९ पुरुष होते आणि २०२५ मध्ये २,७१७ पुरुष होते. शिवाय, महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोग आहे. एकूणच, राष्ट्रीय राजधानीत स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोग आहे. आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये ३,१९८, २०२४ मध्ये ३,२६० आणि २०२५ मध्ये ३,३२१ प्रकरणे नोंदवली गेली. तोंडाचा कर्करोग हा एकूण दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात सामान्य कर्करोग प्रकार म्हणून उदयास आला, २०२५ मध्ये पुरुष आणि महिला दोघांसाठीही ३,२०८ प्रकरणे झाली.
गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगात घटया अहवालातील एक उत्साहवर्धक निष्कर्ष म्हणजे गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये घट. गेल्या काही वर्षांत, गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाबद्दल सामाजिक जागरूकता वाढली आहे, ज्यामुळे महिला वेळेवर तपासणी करण्यास प्रवृत्त झाल्या आहेत.
याचे परिणाम देखील दिसून आले आहेत. अहवालानुसार, २०२३ मध्ये महिलांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे ७४१ रुग्ण आढळले होते, जे २०२४ मध्ये ७१६ पर्यंत कमी झाले आणि २०२५ मध्ये ते आणखी कमी होऊन ६९२ पर्यंत पोहोचले. हे दोन्ही वर्षांत वर्षानुवर्षे अंदाजे ३.४ टक्क्यांनी घट दर्शवते.
पुरुषांमध्ये तोंडाच्या कर्करोगात सर्वात वेगाने वाढ झाली, त्यानंतर फुफ्फुसाचा कर्करोग झाला, २०२३ मध्ये १,६६८ वरून २०२५ मध्ये १,८१४ पर्यंत वाढ झाली. प्रोस्टेट कर्करोगातही सतत वाढ झाली, २०२३ मध्ये १,१६८ वरून २०२५ मध्ये १,३०१ पर्यंत नोंदवलेल्या रुग्णांची संख्या वाढली.फक्त गाठच नाही तर शरीरात दिसून येणारी ही ५ लक्षणे देत असतात ईशरींीं उरपलशी चे संकेत; महिलांनो, सावध व्हा आणि लागेच करा चेकअप-कर्करोग कसा रोखायचा-नवी दिल्लीतील सर गंगा राम रुग्णालयातील कर्करोग विभागाचे अध्यक्ष डॉ. श्याम अग्रवाल यांना जेव्हा आम्ही कर्करोग रोखण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे असे विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की दक्षतेमुळे कर्करोगाच्या अनेक प्रकरणांना रोखता येते.
जरी आपण कर्करोग रोखू शकत नसलो तरी, लवकर निदान आणि काळजीपूर्वक ओळख १००% बरा होऊ शकते, ज्यामुळे कर्करोगमुक्त जगणे शक्य होते. कर्करोग रोखण्यासाठी, सर्वप्रथम, तुमच्या खाण्याच्या सवयी सुधारा. तुम्ही जितके नैसर्गिक खाल आणि कृत्रिम आणि परदेशी पदार्थ जितके जास्त टाळाल तितके तुम्ही कर्करोगमुक्त व्हाल. उदाहरणार्थ, अल्कोहोल, सिगारेट, पॅकेज केलेले अन्न, तळ- लेले पदार्थ, पेये, पिझ्झा, बर्गर, चीज आणि बटर यासारखे प्रक्रिया केलेले अन्न तसेच सर्व प्रक्रिया केलेले अन्न टाळा. त्याऐवजी, संपूर्ण धान्ययुक्त पदार्थ, फळे, बिया आणि सुकामेवा खा. पुरेशी झोप घ्या. ताण कमी करा आणि भरपूर पाणी प्या. दररोज चालणे, व्यायाम करा आणि आनंदी रहा. कर्करोग प्रतिबंधकतेची ही गुरुकिल्ली आहे.

# राजकीय हालचाली गतिमान

महापालिका ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्था नसून, उत्तर महाराष्ट्रातील सत्ता समीकरणे ठरवणारा महत्त्वाचा राजकीय केंद्रबिंदू बनली आहे. जिल्ह्यात सध्या उत्तर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचे केंद्रबिंदू ठरले आहे. महापालिका निवडणुकांची घोषणा होताच सर्वच राजकीय पक्षांच्या हालचाल- ींना वेग आला असून इच्छुकांची गर्दी, अंतर्गत चाचपणी, खासगी सर्वेक्षणे आणि युती-आघाडीची गणिते यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे.
जिल्ह्यातमहापालिकेसाठी सर्वाधिक इच्छुकांची भाऊगर्दी भाजपमध्ये दिसून येते, तर त्याखालोखाल शिंदे गटाच्या शिवसेनेत उत्साह आहे.
या दोन्ही पक्षांची युती व्हावी, अशी राज्यस्तरीय नेतृत्वाची स्पष्ट इच्छा असली, तरी प्रत्यक्ष निर्णयाचा अधिकार स्थानिक पातळीवर असल्याचे सांगितले जात आहे; मात्र स्थानिक नेत्यांच्या 'इनपुटस्'वर वरिष्ठ नेतृत्व किती विश्वास ठेवणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे. शिवसेना सर्व प्रभागांत स्वबळावर लढण्याची मानसिक तयारी ठेवून आहे. प्रसंगी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सोबत घेण्याचे संकेतही सेनेकडून दिले जात आहेत.
महायुतीतील प्रत्येक पक्षाकडे स्वतःची संघटनात्मक यंत्रणा असली, तरी निर्णय घेताना खासगी सर्वे क्षणांचे आकडेही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. एकीकडे स्थानिक नेते 'वरिष्ठ नेते सांगतील तसा निर्णय' असे म्हणतात, तर दुसरीकडे वरिष्ठ नेते 'स्थानिकांना पूर्ण अधिकार' असल्याचे सांगतात. हीच द्विधा अवस्था सध्या महायुतीत दिसून येते.
या युतीत सर्वाधिक कोंडी राष्ट्रवादीची होताना दिसते. भाजपने शिवसेनेला ३२ जागांची ऑफर दिली असून शिवसेनेची मागणी ५० जागांची आहे. ४२ ते ४५ जागांवर तडजोड होण्याची शक्यता असून उरलेल्या ७-८ जागांमध्ये राष्ट्रवादीला सामावून घेण्याचे गणित मांडले जात आहे. महायुती अंतिम झाली, तर भाजप अधिक आक्रमकपणे सत्तेच्या दिशेने वाटचाल करू



शकतो; मात्र महाविकास आघाडीला हलक्यात घेणे धोक्याचे ठरू शकते, असा स्पष्ट 'ग्राऊंड फिडबॅक' सत्ताधारी पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून मिळत आहे.
जळगावमध्ये भाजप-शिवसेना युती जवळपास निश्चित मानली जात आहे. शिवसेनेकडे दोन विद्यमान नगरसेवक असले, तरी भाजपातून गेलेल्यांसह त्यांची संख्या १८ पर्यंत जाते. एकत्र लढल्यास आर्थिक व संघटनात्मक ताण कमी राहील, असा नेत्यांचा कयास आहे. त्यामुळे जळगावमध्ये युतीवर फारसा आक्षेप दिसून येत नाही. धुळ्यात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असा थेट सामना होण्याची शक्यता आहे. एमआयएम चे माजी आमदार फारुख शाह राष्ट्रवादीत आल्याने मुस्लीमबहुल भागातील १९ जागा राष्ट्रवादीचे मुख्य लक्ष्य असतील.
७५ जागांच्या धुळे महापालिकेत भाजपकडे ५१ विद्यमान नगरसेवक आहेत. शिवसेनेचे अस्तित्व नगण्य असल्याने भाजप स्वबळावरच लढण्याची भूमिका घेण्याची शक्यता आहे. मालेगाव महापालिकेत माजी आमदार आसिफ शेख (सेक्युलर फ्रंट) आणि विद्यमान आमदार मौलाना मुफ्ती (महागठबंधन) यांच्यात खरी लढत आहे. मुस्लीम बहुल ६२ जागांवर ही लढत असेल. उर्वरित जागांवर भाजप विरुद्ध सेना सामना रंगू शकतो. सेक्युलर फ्रंट विरुद्ध महागठबंधन हे यासाठी की, जर पुढे भाजप- सेनेबरोबर जावे लागले, तर अडचण नको.
म्हणूनच काँग्रेस, एमआयएम, समाजवादी ही अडचणीची चिन्हे बाजूला ठेवली गेली आहेत.
उत्तर महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका या केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेसाठी मर्यादित न राहता २०२९ च्या विधानसभा आणि लोकसभा समीकरणांची रंगीत तालीम ठरणार आहेत. उमेदवार निवड, युतीचे गणित आणि मतदारांचे सामाजिक- सांस्कृतिक विभाजन यामुळे प्रत्येक शहर स्वतंत्र राजकीय प्रयोगशाळा बनले आहे. मतदारही आता केवळ पक्षनिष्ठेवर नव्हे, तर विकास, स्थानिक नेतृत्व आणि कामगिरीवर निर्णय घेताना दिसत आहे.
त्यामुळे 'कोणाबरोबर'पेक्षा 'कशासाठी' ही निवडणूक लढली जाते, यावरच या महापालिकांच्या सत्ता किल्ल्यांचा निकाल ठरणार आहे.

## आजारापासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स



ही पोषकतत्त्वे हृदयरोगाचा धोका टाळण्यासाठी महत्त्वाची आहेत. बरेचदा पेशंटची माहिती घेताना लक्षात येते की, रोज फळे, कच्चे सलॅड खाल्ले जात नाही. काही विशेष कारण नसते किंवा या गोष्टींची आवड नाही असेही नसते. फक्त लक्षपूर्वक नियोजन केले जात नाही. जर सगळ्यांनी रोज एक-दोन फळे खाल्ली व कच्च्या भाज्यांचे एक वाटी सॅलड शिजवलेल्या व्यतिरिक्त खाल्ले तर खूप फायदा होईल. धान्ये : वेगवेगळी सर्व प्रकारची धान्ये जी आपल्याकडे मिळतात त्या सर्वांचा आहारात समावेश असावा. धान्यांचे पीठ बनवताना जाडसर दळावे, मैद्यासारखे बारीक पीठ वापरू नये. जेवढा पीठात कोंडा असेल तेवढे चांगले. आजकालचे काही नवीन पदार्थ करताना ब्रेड वापरला जातो. तोदेखील गव्हाचा किंवा मल्टीग्रेन वापरावा. नेहमी पास्ता खाणाऱ्यांनी मैद्याचा पास्ता न खाता गव्हाचा पास्ता खावा. रोज भात खाणाऱ्यांनी हातसडीचा तांदूळ किंवा ब्राऊन राईस घेणे चांगले.
हे थोडे बदल धान्याचे पदार्थ निवडताना केले तर आरोग्य चांगले राहायला मदत होईल. प्रोटीन : आहारात प्रोटीनचा योग्य प्रमाणात समावेश करणेदेखील हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले आहे.




## विनोद

डॉक्टर : तू आता काही तासांचाच सोबती आहेच. तुझी शेवटची इच्छा सांग.
पेशंट : हो, मला दुसऱ्या डॉक्टरला दाखवायचे आहे.

## संदेश

Larka Udaas Betha Tha.
Pappu: Kiya Hua Udaas Q Ho?
Larka: Meri Mangeter Mujh se Baat Nahi Kerti.
Pappu: Meri Halat To Tujh se Ziyada Kharab Hai.

Larka: Wo Kese ?

Pappu: Dunya Me Saarhy 3 Arab Larkiyan Hen, Magar Mujhy Ek Bhi Mun Nahi Lagati..

## सुविचार

महान सत्ये अगदी साधीसुधी असतात. थोर माणसे देखील.- जे. हेअर




### संस्कृत सुभाषित

**प्राणा: प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निव- ासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

### आडवे उत्तर

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रस- वान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

### उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लह- ानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गद- ाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### लिलावानंतर मुंबई इंडियन्सचा संपूर्ण संघ आहे तरी कसा

दुबई-आयपीएलचा लिलाव अखेर पार पडला.या लिलावात मुंबई इंडियन्सच्या संघाने चाणाक्ष खेळी केली.मुंबई इंडियन्सकडे जास्त पैसे नव्हते,पण तरीही त्यांना फार कमी पैशांत जबरदस्त खेळाडू आपल्या ताफ्यात दाखल केले आहेत. मुंबई इंडियन्सच्या संघाकडे लिलावासाठी तीन कोटी रुपयेही नव्हते.त्यामुळे मुंबईला या लिलावात नामांकित खेळाडू घेता आले नाही,पण तरीही मुंबईच्या संघाने यावेळी आपल्याकडे असलेल्या कमी पैशांतही चांगल्या खेळाडूंना संघात स्थान दिले आहे.दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज फलंदाज आणि यष्टीरक्षक क्विंटन डीकॉकला त्यांनी आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले,पण त्यासाठी फक्त त्यांनी एक कोटी रुपयेच खर्च केले.त्यानंतर मुंबईच्या संघाने महाराष्ट्राच्या दानिश मालिवारलाही आपल्या ताफ्यात सामील केले आहे.त्याचबरोबर अथर्व अंकोलेकर, मयंत रावत आणि मोहम्मद इझहार यांनाही मुंबईने आपल्या संघात दाखल केले आहे.आयपीएल २०२६ लिलावात मुंबई इंडियन्सने खरेदी केलेल्या खेळाडूंची संपूर्ण यादी: क्विंटन डी कॉक (१ कोटी रुपये), दानिश मालेवार (३० लाख रुपये), मोहम्मद इझहार (३० लाख रुपये), अथर्व अंकोलेकर (३० लाख रुपये), मयंक रावत (३० लाख रुपये).

राखून ठेवलेले खेळाडू: हार्दिक पांड्या, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, टिळक वर्मा, रायन रिकलटन, रॉबिन मिन्झ, मिचेल सँटनर, कॉर्बिन बॉश, नमन धीर, जसप्रीत बुमराह, ट्रेंट बोल्ट, अल्लाह गफनझार, अश्वनी कुमार, दीपक चहर, विल जॅक्स, रघु शर्मा, राज अंगद बावा.

### आयपीएल २०२६ लिलावात २५.२० कोटी रुपयांना विकला गेलेला खेळाडू काही तासांत शून्यावर आउट;

शॅडलेड-ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड क्रिकेट संघात यांच्यातील सुरु असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात, ऑस्ट्रेलियाचा स्टार खेळाडू कॅमेरॉन ग्रीननं कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) ची चिंता वाढवली आहे. मंगळवारी, आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावात, केकेआरने २५.२० कोटी रुपयांची सर्वाधिक बोली लावून ग्रीनला त्यांच्या संघात समाविष्ट केली. मात्र ॲडलेडमध्ये खेळल्या जाणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्यात, ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लाबुशेन बाद झाल्यानंतर ग्रीन मैदानावर आला, परंतु फक्त दोन चेंडूंचा सामना केल्यानंतर तो शून्यावर बाद झाला. इंग्लंडच्या जोफ्रा आर्चरनं दुसऱ्याच चेंडूवर त्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

केकेआरने २५.२० कोटींत घेतले संघात : २५ वर्षीय ग्रीनसाठी केकेआर आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात जोरदार बोली लढाई झाली, चेन्नईनं २५ कोटी इतकी बोली लावली. मात्र लिलावात ६४.३ कोटी बजेट असलेल्या केकेआरनं ग्रीनला विकत घेतलं आणि आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागड्या परदेशी खेळाडूचा विक्रम प्रस्थापित केला. ग्रीनसाठी केकेआरची बोली २०२४ च्या हंगामापूर्वी कोलकाता नाईट रायडर्सनं त्याचा सहकारी मिशेल स्टार्कसाठी २४.७५ कोटींमध्ये ठेवलेल्या मागील विक्रमापेक्षा थोडी जास्त होती.केकेआरची चिंता वाढली : सर्वाधिक महागडा खेळाडू ठरल्यानंतर खेळलेल्या पहिल्याच सामन्यात तो शुन्यावर आउट झाला. यामुळं केकेआरची चिंता वाढली आहे.

### 'माजी क्रिकेटपटू सलीम दुर्राणी माझे पती...' बेघर महिलेचा दावा; सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल

नवी मुंबई-भारतीय क्रिकेटमधील एकेकाळी लोकप्रिय खेळाडू सलीम दुर्रानी, हे नाव पुन्हा चर्चेत आल आहे. कारण दोन वेळच्या अन्नालाही मोहताज असलेली एक बेघर महिला क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांची पत्नी असल्याचं सांगत आहे. हा व्हिडीओ एनजीओ चालवणाऱ्या एका व्लॉगर तरुणानं बनवला असून त्यानं बनवलेला व्हिडीओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. या प्रकरणात सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.नेमका प्रकार काय आहे : नवी मुंबईतील घणसोली इथं असलेल्या एका एनजीओमध्ये बेघर, नातेवाईक नसलेल्या अडल्या नडलेल्या गोरगरीब वृद्ध लोकांना आणून त्यांची काळजी घेतली जाते. एक महिला नवी मुंबईतील बेलापूर मेट्रो स्टेशनजवळ अंत्यत वाईट अवस्थेत फिरताना आढळून आली, या संबंधित महिलेची चौकशी केली असता या महिलेनं दिवंगत भारतीय अष्टपैलू क्रिकेटपटू खेळाडू सलीम दुर्रानी यांची पत्नी असल्याचं सांगितलं आहे, त्यांना दोन मुलंही असल्याचं सांगितलं आहे. या घटनेमुळं सर्वत्र खळबळ माजली आहे. सद्यस्थितीत दयनीय अवस्था असलेली ही महिला अंत्यत श्रीमंतीत जीवन जगत होती. ती दुबई एयरलाईन्समध्ये कार्यरत होती व एअरलाईन्स चालवत होती असंही त्यांनी सांगितलं आहे. तसंच ती महिला मूळची बंगळुरु येथील असल्याचं सांगितलं आहे. मात्र सद्यस्थितीत सलिम दुर्रानी यांची पत्नी

## दक्षिण आफ्रिका वि. भारत सामना अखेर रद्द

### चौथ्या टी-२० सामन्याला धुक्याचा फटका!

लखनौः भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी२० मालिकेतील चौथा सामना आज लखनौ येथे खेळला जाणार होता. परंतु, हा सामना धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने रद्द करण्यात आला आहे.

वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर खेळवण्यात येणार होता. परंतु, हा सामना ठरलेल्या वेळेवर खेळवण्या येऊ शकला नाही धुक्यामुळे सामन्याची वेळ पुढे ढकलण्यात आली होती. अखेर आता हा सामना रद्द करण्यात आला आहे. सामना रद्द करण्यामागील मुख्य कारण म्हणजे लखनौमध्ये पसरलेले दाट धुके, ज्यामुळे दृश्यमानता कमी झाली आणि अखेर पंचांना हा सामना रद्द करावा लागला.

पंचांकडून अखेर सामना रद्द

पंच तपासणीसाठी मैदानात आल्यावर चाहते सामन्याच्या आशेने वाट पाहत असल्याचे दिसत होते. त्यांनी फलंदाजाच्या क्रीझवरून फ्लडलाइट्सची पाहणी केली आणि अखेर सामना रद्द करण्यात आला आहे. हे अपरिहार्य होते, कारण दृश्यमानता सुधारण्याची कोणतीही शक्यता नव्हती.

लखनौमध्ये धुक्याचा कहर

सध्या उत्तर भारतात हिवाळ्याचे मोठे परिणाम दिसू लागेल आहेत. त्याला आता लखनौ हे शहर देखील त्याला अपवाद राहिलेले नाही. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने घट होत आहे. १७ डिसेंबर रोजी लखनौमध्ये किमान तापमान ११ अंश सेल्सिअस आणि कमाल तापमान १६ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान खात्याकडून आधीच धुक्याचा इशारा जारी करण्यात आला होता, ज्याचा आता सामन्यावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. अखेर आता सामना रद्द करण्यात आला.




## ६ ऑस्ट्रेलियन खेळाडूंवर ४५.७० कोटी अन् ५ अनकॅप्ड भारतीय खेळाडूंवर ४५ कोटी!

दिल्ली-आयपीएल २०२६ चा मिनी लिलाव मंगळवारी अबू धाबीत पार पडला. ४८ भारतीय आणि २९ परदेशी खेळाडूंवर २१५.४५ कोटी रुपये खर्च झाले. फक्त ६ ऑस्ट्रेलियन खेळाडू ४५.७० कोटी रुपयांना विकले गेले. भारतातील अनकॅप्ड खेळाडूंनाही मोठी मागणी होती, ज्यामध्ये टॉप ५ खेळाडूंवर ४५ कोटी रुपये खर्च झाले. लिलावात २३ वेगवान गोलंदाज, ९ फिरकीपटू, १२ यष्टीरक्षक, १० फलंदाज आणि २३ अष्टपैलू खेळाडू विकले गेले. त्यापैकी पॉवर-हिटिंगवाल्यांना जास्त मागणी होती. कोलकाताने सर्वाधिक १३ खेळाडू खरेदी केले, तर पंजाबने सर्वात कमी ४ खेळाडू खरेदी केले. मुंबईने सर्वात कमी २.२० कोटी रुपये खर्च केले. स्टीव्ह स्मिथ, महेश थीकशन आणि डेव्हॉन कॉनवे सारख्या दिग्गज खेळाडूंची विक्री झाली नाही.

सहा ऑस्ट्रेलियन खेळाडू ४५.७० कोटी रुपयांना विकले गेले

आयपीएल लिलावात ऑस्ट्रेलियन खेळाडू नेहमीच सर्वात महागडे खेळाडू असतात आणि यावेळीही तेच खरे झाले. सहा खेळाडूंना एकूण ४५.७० कोटी मिळाले, म्हणजेच प्रत्येक खेळाडूचे सरासरी उत्पन्न ७.५० कोटींपेक्षा जास्त झाले. फलंदाज कॅमेरून ग्रीन स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात महागडा परदेशी खेळाडू ठरला, त्याला कोलकाता नाईट रायडर्सने २५.२० कोटींना खरेदी केले. श्रीलंकेतील इतर




परदेशी खेळाडूंना २४ कोटी मिळाले.

वेगवान गोलंदाज मथिश पाथिराना देखील केकेआरने १८ कोटींना खरेदी केले. बांगलादेशचा फक्त एक आणि वेस्ट इंडिजचा दोन खेळाडू विकले गेले, परंतु त्यांच्या किमती ९ कोटींपेक्षा जास्त झाल्या. दक्षिण आफ्रिकेतील खेळाडूंना सर्वात कमी किंमत मिळाली, देशातील चार खेळाडू विकले गेले, परंतु एकही खेळाडू २ कोटींपेक्षा जास्त झाला नाही.

आयपीएलच्या मिनी-लिलावात स्थानिक खेळाडूंवर भर

आयपीएलच्या मिनी-लिलावात स्थानिक अनकॅप्ड खेळाडू अनेकदा लक्षणीय लक्ष वेधून घेतात. यावेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली. ४८ भारतीयांपैकी ३९ जणांनी अद्याप आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण केलेले नव्हते. तरीही, टॉप पाच खेळाडूंवर ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. दोन खेळाडू १४ कोटींपेक्षा जास्त किमतीला विकले गेले, जे आयपीएलच्या इतिहासातील एक विक्रम आहे. यापूर्वी, हा विक्रम अवेश खानच्या नावावर होता, जो २०२२ मध्ये १० कोटी रुपयांना विकला गेला होता. लिलावात एका अनकॅप्ड ऑस्ट्रेलियन खेळाडूलाही खरेदी करण्यात आले. अष्टपैलू जॅक एडवर्ड्स हैदराबादमध्ये ३ कोटी रुपयांना सामील झाला. एकूण १० अनकॅप्ड खेळाडू करोडपती झाले, त्यापैकी ३० खेळाडू ३० ते ९५ लाख रुपयांच्या दरम्यान विकले गेले.

वेगवान गोलंदाजांना मागणी

मिनी लिलावात वेगवान गोलंदाजांची मागणी आणि अष्टपैलू खेळाडूंचे वर्चस्व दिसून आले. २३ अष्टपैलू खेळाडूंपैकी १२ करोडपती झाले, त्यापैकी ६ खेळाडू ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीला विकले गेले. विकल्या गेलेल्या ३२ गोलंदाजांपैकी १३ करोडपती झाले. यापैकी २ वेगवान गोलंदाज २७.२० कोटी रुपयांना विकले गेले.१० फलंदाज विकले गेले आणि अव्वल खेळाडू कॅमेरॉन ग्रीन वगळता उर्वरित ९ खेळाडूंची किंमत फक्त ११.३५ कोटी रुपये होती. तथापि, यष्टीरक्षक-फलंदाजांनी निश्चितच सर्वांना आश्चर्यचकित केले. १२ यष्टिरक्षक ३८.६० कोटी रुपयांना विकले गेले, त्यापैकी १० करोडपती झाले. फक्त ९ फिरकी गोलंदाज विकले गेले, त्यापैकी फक्त ३ जण १ कोटी रुपयांचा आकडा ओलांडू शकले.

## क्रीडामंत्री माणिकराव कोकाटेंचा राजीनामा

मुंबई-क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा



दिल्याची माहिती समोर आली आहे. राज्यापल आचार्य देवव्रत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्राचा संदर्भ देत खातेबदल पत्रावर मंजुरी दिली आहे. त्यामुळे, राज्याच्या राजकीय वर्तुळातील ही सर्वात मोठी बातमी असून आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच माणिकराव कोकाटे यांच्याकडील सर्व खात्यांची जबाबदारी असणार आहे. माणिकराव कोकाटे यांनी अजित पवारांकडे आपला राजीनामा दिला होता. त्यानंतर, सर्व घडामोडी वेगाने घडल्या आहेत.

सदनिका घोटाळाप्रकरणी जिल्हा न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यानंतर माणिकराव कोकाटे आज सकाळीच मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांच्यावर तिथे उपचार सुरू असल्याची माहिती आहे. दरम्यान, अजित पवारांकडे आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर माणिकराव कोकाटे यांची खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. नाशिक सत्र न्यायालयाने काल (मंगळवारी, ता १६) सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यामुळं माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली होती. विरोधी पक्ष माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झाले होते. कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मात्र, त्याची सुनावणी शुक्रवारी होणार आहे, त्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचं समोर आलं आहे.

**माणिकराव कोकाटे बिनखात्याचे मंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटेंचं मंत्रीपद काढून घेतलं आहे. माणिकराव कोकाटेंची खाती अजित पवारांकडे वर्ग करण्यात आल्याने ते आता बिन खात्याचे मंत्री बनले आहेत. क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग ही खाती अजित पवारांकडे सोपवली गेली आहेत. मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना पत्र दिल्यानंतर राज्यपालांकडूनही त्यास मंजुरी देण्यात आली.

**कोकाटेंविरुद्ध अटक वॉरंट जारी**

सदनिका घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज युक्तिवाद होऊन न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. तसेच, माणिकराव कोकाटे यांना कधी अटक केली जाणार हे पाहता येईल.

## आयपीएल २०२६ तब्बल ६७ दिवस चालणार, २६ मार्च ते ३१ मे दरम्यान क्रिकेट सामने होणार

मुंबई-आयपीएल २०२६ तब्बल ६७ दिवस चालणार आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या तारखांनुसार आयपीएल २०२६ ची सुरुवात २६ मार्च २०२६ रोजी होईल आणि समारोप ३१ मे २०२६ रोजी होणार आहे.

अबुधाबी येथे आयपीएल २०२६ साठी मंगळवारी मिनी ऑक्शन अर्थात छोटा लिलाव झाला. यावेळी सर्व फ्रँचायझींना अर्थात संघ व्यवस्थापनांना आयपीएल २०२६ च्या तारखांची औपचारिक माहिती देण्यात आली. बीसीसीआयने अद्याप आयपीएल २०२६ चा सविस्तर कार्यक्रम जाहीर केलेला नाही पण स्पर्धा ६७ दिवस चालणार असल्याची कल्पना दिली आहे. आयपीएलचा १९ वा हंगाम भारत आणि श्रीलंकेत ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान होणाऱ्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाच्या समाप्तीनंतर सुमारे तीन आठवड्यांनी सुरू होईल आणि तो दोन महिन्यांहून अधिक काळ चालेल.

आयपीएल २०२६ च्या ऑक्शनमध्ये कोणत्या टीमनं आत्तापर्यत कोणत्या खेळाडूला खरेदी केलं आहे ते पाहू

उडघ : प्रशांत वीर, कार्तिक शर्मा, अकेल हुसेन, मॅट शॉर्ट, अमन खान, सर्फराज खान, राहुल चहर, मॅट हेन्री, झॅक फोल्कस

ऊळ : अकिब नबी, डेव्हिड मिलर, बेन डकेट, पथूम निशांका, लुंगी एन्गिडी, साहिल पारीख, पृथ्वी शॉ, कायले जेमिन्सन. पी. राजजीटी: अशोक शर्मा, जेसन होल्डर, ल्यूक वुड, टॉम बँटन

घघठ : कॅमेरुन ग्रीन, मथीशा पथिराना, तेजस्वी सिंह, फिन एलन, प्रशांत सोळंकी, कार्तिक त्यागी, राहुल त्रिपाठी, टीम सैफर्ट, मुस्तफिजूर रहमान, रचिन रविंद्र, आकाशदीप,एलएसजी: मुकल चौधरी, एनरिक नॉर्किया, वहिंदू हसरंगा, नमन तिवारी, जोश इंग्लिस, चख : क्विंटन डी कॉक, दानिश मालेवार, मोहम्मद इजहार, अथर्व अंकोलकर, मयांक रावत

## फलंदाजांच्या क्रमवारीत स्मृती मानधना अव्वल स्थानावर

नवी दिल्ली-भारतीय महिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधने स्वत: सोशल मीडियावर पोस्ट करत पलाश मुच्छलसोबत लग्न मोडल्याची माहिती दिली होती.



स्मृतीचे लग्न, वडीलांची तब्येत, पलाशचे व्हायरल चॅट्स यासर्वावर स्मृतीच्या लग्न मोडल्याच्या पोस्टमुळे पूर्णविराम मिळाला. मात्र यानंतर तिच्या चाहत्यांमध्ये तिच्या मानसिक परिस्थितीची काळजी दिसून येत आहे.

## नियोजन करताना डोके कुठे होते?, चौथा टी-२० सामना रद्द, चाहत्यांनी थेट बीसीसीआयला घेरले, संतप्त टीका

दिल्ली-मैदानात धुक्याची चादर आणि धोकादायक परिस्थितीमुळे भारत-दक्षिण आफ्रिका चौथा टी-२० सामना अखेर रद्द करण्यात आला, ज्यामुळे बीसीसीआयच्या नियोजनावर पुन्हा टीका होतं आहे. डिसेंबर महिना सुरू झाला की लखनऊ, दिल्लीसारख्या उत्तर भारतातील शहरांमध्ये दाट धुके आणि धूरची गंभीर समस्या निर्माण होते, हे सर्वांनाच माहीत आहे. तरीही दरवर्षी याच काळात या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय सामने आयोजित केले जातात आणि परिणामी सामने उशिरा सुरू होणे, टॉस न होणे किंवा थेट सामना रद्द होण्याची नामुष्की बीसीसीआयवर ओढवते. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथा टी-२० सामना लखनऊमध्ये रद्द झाल्यानंतर पुन्हा एकदा बीसीसीआयच्या नियोजन क्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. चाहत्यांचा आणि क्रिकेट तज्ज्ञांचा रोखठोक सवाल आहे की, डिसेंबरमध्ये उत्तर भारतात हवामान कसे असते याची पूर्ण कल्पना असतानाही असे सामने तिथे का ठेवले जातात?. क्रिकेटप्रेमींमध्ये ही भावना अधिक तीव्र आहे की हिवाळ्यातील सामने प्रामुख्याने दक्षिण भारतातील शहरांमध्ये आयोजित करायला हवेत. चेन्नई, बेंगळुरू, हैदराबाद, तिरुवनंतपुरमसारख्या ठिकाणी या काळात हवामान तुलनेने स्थिर असते आणि सामने सुरळीत पार पडू शकतात. खेळाडूंच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असताना वारंवार अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणे ही गंभीर बाब मानली जात आहे. 'मूलभूत नियोजन इतकं अवघड नसावं,' अशी स्पष्ट प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत असून बीसीसीआयने भविष्यात वेळापत्रक ठरवताना हवामानाचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी होत आहे. सामना रद्द होणे हे केवळ संघांसाठीच नाही, तर प्रेक्षक, प्रसारक आणि क्रिकेटच्या प्रतिमेसाठीही धक्का मानला जात असून, आता तरी बीसीसीआय यामधून धडा घेणार का, हा खरा प्रश्न आहे.या प्रकरणावर चाहत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## शतकासाठी ॲलेक्स कॅरीचा फ्रॉड गेम? व्हिडीओ व्हायरल होताच ती चूक समोर; चाहते सदम्यात



नवी दिल्लीःइंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ॲशेस मालिकेतील तिसरा सामना ॲलेडलेड येथे खेळला जात आहे. या सामन्यात शतक झळकवणाऱ्या ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षक-फलंदाज ॲलेक्स कॅरीची विकेट्स होती की नाही असा वाद रंगला आहे.

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात प्रतिष्ठेची मानली जाणारी ॲशेस मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील २ सामने खेळून झाले आहेत. या दोन्ही सामन्यात ऑस्ट्रेलियाने बाजी मारली आहे आणि मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. या मालिकेतील तिसरा सामना ॲलेडलेड येथे खेळला जात आहे. टॉस जिंकून ऑस्ट्रेलियाने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तर इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत पहिला दिवसाचा खेळ संपला तेव्हा ८ बाद ३२६ धावा केल्या आहेत. दरम्यान या सामन्यात एक वादग्रस्त घटना घडली. शतकवीर ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षक-फलंदाज ॲलेक्स कॅरी दोषी आहे की नाही. याबाबत आता चर्चा रंगू लागली आहे. या सामन्यातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आहे.

या त्याच्याविरुद्ध कॅच अपील केल्यानंतर इंग्लंडचे खेळाडू आत्मविश्वास पूर्ण दिसून येत आहेत. तथापि, डीआरएस निकालांनी सर्वांनाच चकित करणारा निकाल दिला. चेंडू बॅटवर आदळण्यापूर्वी अल्ट्रा एज सिग्नल दिसत असला तरी व्हिडिओमध्ये चेंडू आणि बॅटमधील महत्त्वपूर्ण अंतर देखील दिसत आहेत. म्हणूनच सर्वांना धक्का बसला आहे. शेवटी, चेंडू आणि बॅटमधील अंतर लक्षात घेता, पंचांनी त्याला नॉट आउट करार दिला. या निर्णयावर आता प्रश्नचिन्ह देखील उपस्थित होऊ लागले आहेत.

ॲलेक्स कॅरीचे तिसरे कसोटी शतक

ॲलेक्स कॅरीने ॲलेडलेडमध्ये मिळालेल्या जीवनदानाचा चांगलाच फायदा घेतला. सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करायला आलेल्या कॅरीने त्याचे तिसरे कसोटी शतक झळकवले. सामन्यादरम्यान सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना, त्याने एकूण १४३ चेंडूंचा सामना करत ७४.१२ च्या स्ट्राईक रेटने १०६ धावा फटकावल्या. क्रिकेट चाहत्यांनी त्याच्या बॅटमधून आठ चौकार आणि एक सुंदर षटकार ठोकले. पहिल्या डावात कॅरीला विल जॅक्सने जेमी स्मिथकरवी झेलबाद करून माघारी पाठवले.

कॅरीची आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकीर्द

ॲलेक्स कॅरीने ऑस्ट्रेलियासाठी एकूण ४६ कसोटी, ८५ एकदिवसीय आणि ४२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून त्याने ६८ कसोटी डावांमध्ये २२०५ धावा, ७७ एकदिवसीय डावांमध्ये ३५.०७ च्या सरासरीने २२४५ धावा तर २९ टी-२० डावांमध्ये ११.१२ च्या सरासरीने २६७ धावा फटकावल्या आहेत. कॅरीने कसोटी क्रिकेटमध्ये तीन शतके आणि १२ अर्धशतके आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये एक शतक आणि १३ अर्धशतके लागावळी आहेत.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सोलापूर यार्डमधील १०३ वर्षे जुने आरओबी कमीत कमी प्रवाशांच्या गैरसोयीसह पाडण्यासाठी १३ तास ३० मिनिटे ब्लॉक यशस्वीरित्या राबवला





**सोलापूर/प्रतिनिधी :** ब्लॉक कालावधीचा उत्तम वापर करत सोलापूर-वाडी विभागात देखभालीची आवश्यक कामे करण्यासाठी २१ शॅडो ब्लॉक्स यशस्वीरीत्या पूर्ण केला.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १४.१२.२०२५ रोजी १३ तास ३० मिनिटांचा विशेष ट्रॅफिक ब्लॉक यशस्वीरित्या राबवला, ज्यामध्ये काटेकोर नियोजन, विभागीय समन्वय तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सेवा सातत्यासाठी दृढ वचनबद्धता दर्शवली गेली. सोलापूर विभाग १२ तास ४५ मिनिटांत काम पूर्ण करण्यात आणि संपूर्ण सोलापूर यार्ड सामान्य कामकाजासाठी उघडण्यात यशस्वी झाला. लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आयुक्त, पोलिस आयुक्त आणि इतर राज्य अधिकाऱ्यांसह सर्व प्रमुख भागधारकांना या उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली. आरओबी लवकरात लवकर पाडण्याची गरज ओळखून राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी सोलापूर विभागाला पूर्ण सहकार्य केले.

विशेष वाहतूक ब्लॉकचा आढावा

सोलापूर यार्ड येथील १९.७ मीटर लांबीचा, १०३ वर्षे जुना रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) पाडण्यासाठी वाहतूक ब्लॉक हाती घेण्यात आला होता. जो कालांतराने जड वाहनांच्या वाहतुकीसाठी असुरक्षित बनला होता. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) ने भारतीय रेल्वेशी जवळून समन्वय साधून तोडण्याचे काम केले, ज्यामुळे संपूर्ण ऑपरेशन दरम्यान महत्त्वाच्या रेल्वे पायाभूत सुविधांचे संरक्षण सुनिश्चित झाले.

ब्लॉक दरम्यान, ओएचई प्रतिष्ठापने, इलेक्ट्रिक वायर, ट्रॅक आणि पॉइंट्ससह रेल्वे मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी व्यापक सुरक्षा उपाय अंमलात आणण्यात आले. ओएचई वायर टाकण्यासाठी आणि पुनर्संचयित करण्यासाठी एकूण ४ टॉवर वॅगन / ओएचई तपासणी कार तैनात करण्यात आल्या. या ट्रॅक आणि पॉइंट्ससह स्टील चॅनेल, वाळूच्या पिशव्या आणि प्लायवूड प्लँक्सचा वापर करून काळजीपूर्वक पहारा देण्यात आला होता जेणेकरून ढिगारा पडून आणि माती हलवणाऱ्या यंत्रसामग्रीच्या हालचालींमुळे कोणतेही नुकसान होऊ नये. तोडण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर, सर्व निर्धारित सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करून रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यात आली.

आरओबी तोडण्यासाठी तैनात केलेल्या यंत्रसामग्रीमध्ये ३ हायड्रॉलिक क्रेन (क्षमता २२५ टन, २०० टन, २०० टन), ३ एक्सकॅव्हेटर ब्रेकर, ४ जेसीबी, २ बॉबकॅट्स (मिनी एक्सकॅव्हेटर), २ लाँग बूम एक्सकॅव्हेटर, ३ हार्ड ब्रेकर, ३ ट्रॅक्टर ब्रेकर, ४ ट्रॉली असलेले ट्रॅक्टर यांचा समावेश होता.

जुने आरओबी तोडण्याची गरज

- आरओबीची संरचना त्याच्या अंतिम टप्पात पोहोचली होती.

- सध्य स्थिती पाहता रेल्वे रुळांवर १९.७ मीटरच्या ब्रिज मुळे सोलापूर रेल्वे विभाग १५ किमी प्रतितास पेक्षा जास्त वेग हाताळू शकत नव्हता.

- रेल्वे आणि आरओबी मधील उंची मर्यादित असल्याने ट्रॅक आवश्यक मानकांनुसार राखता आला नाही.

- ओव्हरहेड ट्रॅक्शन पॉवर लाईन्सच्या मर्यादित क्लिअरन्स मुळे, आरओबी अंतर्गत देशात सहज उपलब्ध नसलेले विशेष इन्सुलेशन प्रदान केले गेले. शिवाय, २५ केव्ही लाईन्स आणि रोलिंग स्टॉकमधील पृथक्करण देखील किमान सुरक्षित पृथक्करणापेक्षा कमी होते. सोलापूर जवळील पाकणी येथे आयओसीएल साइडिंगद्वारे पेट्रोलियम लोडिंग दुप्पट होणार असल्याने, या क्लिअरन्समुळे या आरओबी अंतर्गत ज्वलनशील मालवाहतुकीवर परिणाम होऊ लागला.

- या आरओबीने बाळे ते दक्षिण पश्चिम रेल्वेकडे रो-रो सेवा आर्थिकदृष्ट्या पार पाडण्यावर मर्यादा आणल्या.

कमीत कमी प्रभावाने गाड्या चालवल्या गेल्या

ट्रॅक ब्लॉकची योजना आखण्यात आली होती जेणेकरून ट्रेन ऑपरेशनमध्ये व्यत्यय आणि प्रवाशांची गैरसोय कमी होईल. परिणामी, सोलापूर स्थानकावरून धावणाऱ्या बहुतेक प्रमुख गाड्या कोणत्याही किंवा कमीत कमी अडथळ्यांशिवाय धावत होत्या, ज्यामुळे मुंबई, पुणे आणि देशाच्या उत्तर व दक्षिण भागात जाणाऱ्या प्रवाशांना सहज प्रवास करता आला. वंदे भारत एक्सप्रेस, हुतात्मा एक्सप्रेस, सिद्धेश्वर एक्सप्रेस, कर्नाटक एक्सप्रेस, सीएसएमटी मुंबई-चेन्नई एग्मोर सुपरफास्ट मेल, सीएसएमटी मुंबई-चेन्नई सेंट्रल एक्सप्रेस आणि कलबुरगि-कोल्हापूर-कलबुरगि सुपरफास्ट एक्सप्रेस यासारख्या गाड्या प्रवाशांना कार्यक्षमतेने सेवा देत राहिल्या.

पारदर्शकता आणि प्रवाशांची तयारी सुनिश्चित करण्यासाठी, सामान्य जनतेला वाहतूक व्यत्यय, वळवणे, शॉर्ट टर्मिनेशन आणि ओरिजिनेशन, रीशेड्युलिंग आणि नियमांबद्दल सविस्तर प्रेस रिलीझ, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, अधिकृत रेल्वे ॲप्स, मार्ग नकाशे आणि एसएमएस अलर्टद्वारे माहिती देण्यात आली.

प्रवाशांच्या सोयीसाठी मदत केंद्र

प्रवाशांना कमीत कमी गैरसोय व्हावी आणि त्यांच्या मदतीसाठी, सोलापूर, कलबुरगि, पंढरपूर आणि कुर्डुवाडीसह प्रमुख स्थानकांवर मदत केंद्रे स्थापन करण्यात आली. ट्रेन वळवणे आणि शॉर्ट टर्मिनेशन दरम्यान विशेष व्यवस्था करण्यात आली. पुणे-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस कुर्डुवाडी येथे थांबवण्यात आली व सोलापूरला जाणाऱ्या प्रवाशांना राज्य परिवहन बसेस द्वारे सोलापूरला नेण्यात आले. पुणे-हैदराबाद वळवलेल्या मार्गावरून धावणारी शताब्दी एक्सप्रेस मधील प्रवाश्यांची धाराशिव स्थानकावर जेवणाची व्यवस्था करण्यात आली.

शॅडो ब्लॉक्सची अंमलबजावणी

आरओबी पाडकामाव्यतिरिक्त, विभागाने सोलापूर-वाडी विभागात २१ शॅडो ब्लॉक घेऊन करून आवश्यक देखभालीची कामे केली, ज्यामुळे भविष्यातील वाहतूक अडथळा कमी झाला. या शॅडो ब्लॉक्समध्ये सोलापूर यार्ड, सोलापूर एसएसपी (उप-विभाग आणि समांतर पोस्ट), सोलापूर-बाळे विभाग, बाळे पूल, मोहोळ-वाकाव-अनगर विभाग, माढा, वडशिंगे, टिकेकरवाडी, होटगी, तिलाटी, अक्कलकोट रोड-नागणसूर विभाग आणि शहाबाद-वाडी विभाग अशा ठिकाणी काम केले गेले. यामध्ये सुरक्षेशी संबंधित ६ प्रमुख कामे समाविष्ट होती.

सोलापूर विभागात संपूर्ण ब्लॉक ऑपरेशनमध्ये ३५४ रेल्वे कर्मचारी आणि ३३७ कंत्राटी कामगारांचा समावेश असलेल्या एकूण ६९१ कर्मचारी व अत्यंत कुशल कर्मचारी तैनात करण्यात आले, ज्यामुळे नियोजित उपक्रमांची २४ तास अंमलबजावणी सुनिश्चित झाली. संपूर्ण ऑपरेशनचे विभागीय शाखा अधिकाऱ्यांनी जागेवर बारकाईने निरीक्षण केले, ज्यामुळे प्रभावी समन्वय आणि जलद निर्णय घेण्याची खात्री झाली.

या मोठ्या ब्लॉक ऑपरेशनची यशस्वी पूर्तता ही मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या सुरक्षा, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि प्रवासी-केंद्रित ऑपरेशन साठी अंतर्गत विभागातील विभागीय समन्वय, काटेकोर नियोजन आणि अढळ वचनबद्धतेची साक्ष आहे.

## दर्श वेळा अमावस्येदिवशीचा पेपर रद्द करण्याची अभाविपची मागणी



**धाराशिव/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दि. १५ डिसेंबर २०२५ पासून बी.ए., बी.कॉम. व बी.एससी. परीक्षांना सुरुवात होत आहे. मात्र दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी दर्श वेळा अमावस्या हा शेतकरी समाजासाठी महत्त्वाचा सण असून धाराशिव व बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधव हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात.

मराठवाडा विभागात बहुतांश विद्यार्थी शेतकरी कुटुंबातील असल्याने या दिवशी परीक्षेचे आयोजन झाल्यास विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे दर्श वेळा अमावस्येदिवशी नियोजित असलेला विद्यापीठाचा पेपर रद्द करून त्याबाबत नव्याने सुधारित वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) धाराशिव शाखेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीसंदर्भात अभाविप धाराशिव शाखेने विद्यापीठ उपपरिसराचे मा. संचालक यांच्या मार्फत मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन सादर केले. यावेळी जिल्हा संयोजक कु. वैष्णवी थिटे, शहर सहमंत्री भार्गव मंजुळे, कार्यालय मंत्री कृष्णा कुलकर्णी, रोहण माळी यांच्यासह अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये ब्रुस एम्स यांची जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी :**दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ डिसेंबर २०२५ रोजी सुप्रसिद्ध अमेरिकन जैवरसायनशास्त्रज्ञ व जनुकशास्त्रज्ञ ब्रूस ऐम्स यांची ९७ वी जयंती दयानंद एज्युकेशन सोसायटीचे अकॅडमिक डेव्हलपमेंट ऑफिसर (एडीओ) डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नीट कोऑर्डिनेटर डॉ.कोमल गोमरे यांच्या पुढाकारातून साजरी करण्यात आली.यावेळी विभाग प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी महान वैज्ञानिकांच्या संशोधनकार्याची ओळख करून देणे,विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन विकसित करणे आणि महाविद्यालयाचा शैक्षणिक लौकिक वृद्धिंगत करणे या उद्देशाने हा उपक्रम सुरू ठेवला आहे असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विभागाच्या प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी ब्रूस एम्स यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून केली.यानंतर प्रा. तृप्ती सोनकांबळे यांनी ब्रूस एम्स यांच्या जीवनप्रवास व संशोधनातील महत्त्वपूर्ण टप्प्यांचा माहितीपूर्ण आढावा सादर केला.

ब्रूस एम्स (जन्म : १६ एप्रिल १९२८) हे ऐम्स चाचणीचे जगप्रसिद्ध जनक म्हणून ओळखले जातात. ही चाचणी रासायनिक पदार्थांचे म्युट्याजनीक व कार्सीनोजनीक पोट्यानशील तपासण्यासाठी सूक्ष्मजीवशास्त्र,जनुकशास्त्र व विषविज्ञान क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोग संशोधन, पर्यावरणीय आरोग्यशास्त्र तसेच जनुकानमधील बदल अभ्यासाला नवी दिशा मिळाली. तसेच पोषणतत्त्वांची कमतरता व डिनए नुकसान यांमधील संबंध स्पष्ट करण्यामध्येही त्यांचे मोलाचे योगदान आहे.या कार्यक्रमास प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## एकजूट, समर्पण आणि लोकसंपर्कातून भाजपचा विजय निश्चीत ना. चंद्रशेखर बावनकुळे

### महापालिका निवडणूक आढावा बैठक ; काँग्रेस पदाधिकाऱ्यासह माजी नगरसेवकाचा भाजपात प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी :** जगातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान भाजपाला कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळे मिळालेला असून राज्यासह देशातील विविध निवडणुकांमध्ये पक्ष पदाधिकारी यांच्या एकजूट भावनेतून केलेल्या लोकसंपर्कामुळे भाजपला विजय मिळाला आहे. हीच समर्पण आणि एकजुटीची भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क आणि केलेल्या विकास कामाच्या बळावर भाजपला लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत निश्चीत विजय मिळेल असा विश्वास महसूल मंत्री तथा निवडणूक प्रदेश प्रभारी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाने लातूर शहरातील औसा रोड येथे असलेल्या पाटील प्लाझा येथे सुरु केलेल्या निवडणूक कार्यालय शुभारंभ प्रसंगी घेतलेल्या आढावा बैठकीत ना. बावनकुळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री तथा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर, प्रदेश सचिव किरण पाटील, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, ॲड. शैलेश गोजमगुंडे, सुधीर धुत्तेकर, सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रविण कस्तुरे आदींची उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र राज्य सरकारने समाजातील प्रत्येक घटकांसाठी विविध योजना राबवत अनेक विकासाची कामे पूर्णत्वास नेली असल्याचे सांगत ना. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले कि नेत्यांच्या निवडणुका झालेल्या असून आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका होत आहेत. नेत्यांच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करत मोठा विजय मिळवलेला आहे. आता कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत नेते सर्वस्वी ताकत पणाला लावत त्यांच्या पाठीशी उभे राहतील असा विश्वास ना. बावनकुळेनी दिला. केंद्र व राज्य सरकारने लातूर शहराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला असून या पुढे लातूरच्या विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली. मात्र हा निधी हक्काने आणण्यासाठी मनपावर भाजपचा झेंडा फडकावणे आवश्यक आहे. सरकारच्या माध्यमातून केलेली विकास कामे कार्यकर्त्यांची एकजूट आणि समर्पण भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क या बळावर भाजपचा विजय निश्चीत होईल असा विश्वास व्यक्त केला. मात्र पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अति आत्मविश्वास बाळगू नये असे सांगून आपण केलेली कामे आणि आगामी काळातील लातूरच्या विकासाची संकल्पना प्रत्येक मतदारापर्यंत पोहचवावी असे आवहान ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

आगामी महापालिका निवडणुकीत आपला विजय निश्चीत असला तरी या विजयासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गाफील न राहता मतदारांशी होत असलेल्या संपर्क मोहिमेला अधिक गती द्यावी अशी अपेक्षा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त करत विरोधकांच्या खोट्या आमिषांना आणि दिशाभूल करणाऱ्या घडामोडींना हाणून पाडून आपण काय केले आणि आगामी काळात लातूरच्या विकासाला कशी गती देणार हे मतदारांना पटवून द्यावे. या निवडणुकीच्या प्रचारात आम्ही सर्वच नेते लातूर ढवळून काढत कार्यकर्त्यांना बळ देत त्यांच्या विजयासाठी जीवाचे रान करू अशी ग्वाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.




बैठकीच्या प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आगामी महापालिका निवडणुक संदर्भात पक्षांने काय काय तयारी केली आहे याची माहिती देत पक्ष आणि पक्षश्रेष्टीना अपेक्षित असणारा निवडणुकीतील विजय मिळवण्यासाठी आम्ही सर्वजन एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करू असा विश्वास दिला. यावेळी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक व्यवस्थापन संदर्भात विविध सूचनाही केल्या.

या बैठकीच्या प्रारंभी काँग्रेसचे माजी नगरसेवक गौरव काथवटे, काँग्रेसच्या प्रदेश रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या उपाध्यक्षा स्वाती जाधव, सचिव दिलीप बेरूलकर, बळीराम गाडेकर, स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील यांनी भाजपात प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करत ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रवेश केलेल्यांना शुभेच्छा देऊन आगामी निवडणुकांसाठी त्यांनी समर्पण भावनेतून काम करावे असे सांगितले. बैठकीचे सूत्र संचलन सरचिटणीस प्रविण कस्तुरे यांनी केले.

## दयानंदच्या उन्नती चामेची भारत अंतराळ शिक्षण संशोधन केंद्र येथे डिफेन्स-स्पेस टेक इंटर्न म्हणून निवड

### महाविद्यालयात प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इयत्ता बारावीत शिक्षण घेत असलेली उन्नती बालाजी चामे या विद्यार्थीनीची भारत अंतराळ शिक्षण संशोधन केंद्र येथे डिफेन्स-स्पेस टेक इंटर्न म्हणून निवड झाली आहे.भारत स्पेस एज्युकेशन रिसर्च सेंटर ऑनलाईन डेफ-स्पेस हिवाळी इंटर्नशिप टेक्निकल ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत तिला संधी मिळत आहे.दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी ओरिएंटेशन सत्रासाठी अंडरस्वाक्षरीकृत भारत स्पेस एज्युकेशन रिसर्च सेंटरमध्ये ती हजर राहणार आहे. तिच्या इंटर्नशिपचा कालावधी दि.१९ डिसेंबर २०२५ ते १९ जानेवारी २०२६ पर्यंत असणार आहे.तसेच बीएसईआरसीच्या आउटरीच डेफ-स्पेस हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रमात ती मौल्यवान योगदान देणार आहे.याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,डॉ.वैशाली पाटील,प्रा.मनीषा बाजपाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

## दर्शवेळा अमावस्या निमित्त लातूर जिल्ह्यात १९ डिसेंबर रोजी स्थानिक सुट्टी

**लातूर/प्रतिनिधी** जिल्ह्यासाठी २०२५ मधील तीन स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी २० जानेवारी, २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार जाहीर केल्या आहेत. १९ डिसेंबर २०२५ (शुक्रवार) रोजी दर्शवेळा अमावस्या निमित्त जिल्ह्यात स्थानिक सुट्टी राहणार आहे.

लातूर जिल्ह्यातील उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील कार्यालये, केंद्रीय कार्यालये, केंद्रीय प्रशासनातील कार्यालये व बँकेच्या कक्षातील कार्यालये वगळता लातूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदेच्या कक्षेतील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, जिल्ह्यातील कोषागारे, महामंडळाची कार्यालये व इतर सर्व खाजगी शैक्षणिक संस्था यांना ही सुट्टी लागू राहील.



# बोचऱ्या थंडीतील पोषक वातावरणात फिरण्यासाठी ज्येष्ठांची गर्दी



उमरगा (प्रतिनिधी)- हिवाळा हा आरोग्य जपण्यासाठी आणि व्यायामाची सवय लावण्यासाठी अत्यंत पोषक ऋतू मानला जातो. थंड वातावरणामुळे शरीराला लवकर घाम येत नाही. त्यामुळे इतर ऋतूंप्रमाणे थकवा न येता अधिक वेळ व्यायाम करता येतो. याच कारणामुळे सध्या शहरासह ग्रामीण भागात मॉर्निंग वॉक करणाऱ्यांची संख्येत वाढ झालेली दिसून येत आहे.

हिवाळ्यात पचनशक्ती चांगली असल्याने भूक वाढते व जेवणही चांगले पचते. त्यामुळे शरीरात आवश्यक ताकद टिकून राहते. या काळात प्रथिनयुक्त आहार घेणे आरोग्यासाठी लाभदायक ठरते. रात्र मोठी असल्याने झोपही चांगली होते. परिणामी शरीराला आवश्यक विश्रांती मिळते. मात्र भरपूर जेवण करत असताना नियमित व्यायाम करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. थंडीत फिरणे, चालणे किंवा भरभर चालणे असा साधा व्यायामही पुरेसा ठरतो. घराजवळील मैदान किंवा बागेत किमान एक तास फेरफटका मारल्यास रक्तप्रवाह सुरळीत राहतो. यामुळे दिवसभर शरीर ताजेतवाने राहते तसेच मानसिक प्रसन्नताही मिळते. नियमित व्यायामामुळे लठ्ठपणा टाळता येतो आणि अकाली वार्धक्याची लक्षणे दूर राहतात.

योगासने, प्राणायाम तसेच आठवड्यातून एकदा सांघिक खेळ खेळल्यास शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच सामाजिक संवादही वाढतो. मात्र चालताना कानात हेडफोन लावून वॉक करणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे शक्यतो मोकळ्या मैदानात आणि सावधपणे व्यायाम करण्याचा सल्ला दिला जात आहे.

एकाग्रता वाढवण्यासाठी नियमित व्यायाम फायदेशीर एकाग्रता वाढवण्यासाठी एकट्याने व्यायाम करणे अधिक फायदेशीर ठरते. नव्याने व्यायाम सुरू करताना एकदम जास्त व्यायाम न करता हळूहळू वेळ वाढवावी. व्यायामामुळे हात-पायातील रक्तप्रवाह वाढतो.

रात्री व्यायाम करणाऱ्यांनी जेवण व फिरणे यामध्ये किमान चार तासांचे अंतर ठेवावे. जेवणानंतर पचनसंस्थेकडे अधिक रक्तप्रवाह लागतो, तर व्यायाम करताना स्नायूंना लागतो. त्यामुळे दोन्ही एकत्र केल्यास शरीरावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे डॉ. लक्ष्मण सातपुते यांनी सांगितले.

# शासनाच्या दिरंगाई विरोधात दिव्यांगांचा एल्गार



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले निर्णय प्रत्यक्षात न उतरवल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिव्यांग बांधवांनी आक्रमक आंदोलन छेडले. स्थानिक आमदार निधी, निराधार व दिव्यांग योजनांचे प्रलंबित लाभ तसेच वाढीव दिव्यांग पेन्शन तत्काळ लागू करावी, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

२७ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार दिव्यांग बांधवांसाठी मंजूर असलेला ३० लाख रुपयांचा स्थानिक आमदार निधी अद्याप खर्च न झाल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. हा निधी तात्काळ खर्च न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. तसेच दि. ०५ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार निराधार व दिव्यांग योजनांतील २५ वर्षांची अट रद्द करण्यात आली असतानाही अनेक लाभार्थ्यांना अद्याप लाभ मिळालेला नाही.

५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंतचे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ मंजूर करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दिव्यांग पेन्शन १५०० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक लाभार्थ्यांना वाढीव पेन्शन मिळालेली नसल्याने शासन निर्णय कागदापुरताच मर्यादित असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आंदोलनाची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मात्र ठोस निर्णय न झाल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.

# मारहाणीची घटना:गुन्हा नोंद

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, सुर्यकांत रा. राळेसांवी ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१५.१२.२०२५ रोजी हॉटेल साईसमोर जयवंत फाटा येथे फिर्यादी अविनाश बळीराम सकुंडे, वय ४३ वर्षे, रा. राळेसांगवी ता. भुम जि. धाराशिव यांना नमुदांनी मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काचेची बाटली मारहाण करुन जखमी केले. व तु गावात कसा राहतो तेच बघतो अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी अविनाश सकुंडे यांनी दि.१६.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे भुम येथे गुन्हा नोंदवला आहे. तसेच परंडा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, भारत, मयुर, रोहन, सर्व रा. आसु परंडा जि. धाराशिव यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी आसु येथे फिर्यादी नामे-चतुर्भुज अर्जुन जाधव, वय ६५ वर्षे, रा. आसु ता. परंडा जि. धाराशिव यांना नमुदांनी वाटेवर गाडी लावून का थांबलात असे विचारण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लोखंडी रॉडने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली.या प्रेरणी गुन्हा नोंदवला आहे


**CHANGE IN NAME**

I have change my name from NASIRODDIN MAHEBOOS KAZI TO NASIRODDIN MAHEBUB KAZI Hence for this declaration in future will use the name NASIRODDIN MAHEBUB KAZI the same name will be used by wife and Children.

**OLD NAME:-** NASIRODDIN MAHEBOOB KAZI
**NEW NAME:-** NASIRODDIN MAHEBUS KAZI
**ADDRESS:**
MILI COLONY, YOSHI ROAD, DHARASHIV
MAHARASHTRA 13581


# विद्यार्थ्यांनी जाणून घेतली साखर निर्मितीची प्रक्रिया: चवही चाखली, विद्यामाता हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची कारखान्यास क्षेत्रभेट

लोहारा(प्रतिनिधी)-आपल्याच शेतातून गेलेला ऊस, त्यापासून साखर कशी तयार होते? याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी कारखान्याला क्षेत्रभेट दिली. उसाचा रस काढण्यापासून ते साखरेचे पोते वाहनात भरून दुकानात येते, हे सगळं विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. प्रत्येकाला उत्सुकता लागलेली होती. गरग गरम साखरेची चवही चाखली. विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले, त्याची माहिती संबंधित अधिकारी, शिक्षकांनी दिली.

निमित्त होते लोहारा तालुक्यातील धानुरी येथील विद्यामाता हायस्कूलच्या इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड या साखर कारखान्याला क्षेत्रभेट देण्यात आली. या क्षेत्रभेटीत कारखान्यातील साखर तयार होण्याची प्रक्रिया कशी चालते? याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात पाहिली. कारखान्यातील मॅनेजमेंटकडून ती माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कारखान्यापर्यंत ऊस कशा पद्धतीने आणला जातो, आल्यानंतर त्याचे वजन कशा पद्धतीने होते व ते ऊस गाडीमधून कशा पद्धतीने उचलले जाते व त्यावरती प्रक्रिया कशी होते याबद्दल सविस्तर माहिती मुलांनी पाहून घेतली.

विद्यार्थ्यांना पडणाऱ्या प्रश्नाचे उत्तरे तेथील अधिकारी व कामगार यांच्याकडून देण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून कारखान्याची निर्मिती होते हे लक्षात आले. कारखाना चालवण्यासाठी लागणारे नियोजन प्रत्यक्ष दर्शनी पाहता आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा या उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापिका हिरा सोलापुरे यांनी या क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांसोबत गजानन माळी, सुरज हावळे, सारिका विभुते, शिवमाला हुडगे उपस्थित होते. तसेच बंदेनवाज शेख, सिद्धू पांचाळ, मुकेश दनाने यांचे सहकार्य लाभले.

गव्हाणीत ऊस टाकण्यापासून पोते भरेपर्यंतचा प्रवास साखर प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम त्यातील रस काढून घेतला जातो अशा चार स्टेपमध्ये रसाची प्रक्रिया होते व त्यानंतर त्याचे पाकात रूपांतर होऊन परत त्यावर रासायनिक प्रक्रिया करून त्यापासून तीन टप्प्यांमध्ये साखर बनवली जाते व त्यानंतर तयार साखरेला पॅकिंग करून गोडावूनमध्ये ठेवण्यापर्यंतची जी प्रक्रिया आहे या सर्व प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

कारखान्यासाठी लागणाऱ्या मशिनरी, त्या कशा ऑपरेट केल्या जातात व कशा पद्धतीने त्याची रचना आहे या सर्व गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना झाली. कारखाना मॅनेजमेंटकडून विद्यार्थ्यांना रस व खाऊ वाटप करण्यात आले.

# शिवराज पाटील चाकूरकर राजकारणातील आदर्श राजहंस -भीमाशंकर हासूरे



जळकोट(विजय पिसे)-माजी दिवंगत गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर हे स्वच्छ प्रतिमा असलेले राजकारणातील राजहंस शोभत होते, असे मत विद्यार्थी सेवा प्रकाशनचे संस्थापक भीमाशंकर हासुरे यांनी व्यक्त केले.

जळकोट येथे हासुरे मित्रमंडळाच्यावतीने माजी केंद्रीय गृहमंत्री चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विद्यार्थी सेवा प्रकाशनच्या 'विद्याधन' कार्यालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेत श्री. हासुरे बोलत होते. याप्रसंगी प्रारंभी उद्योजक शिवानंद स्वामी, माजी ग्रामपंचायत सदस्य भीमाशंकर स्वामी यांच्या हस्ते चाकूरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते माणिकआप्पा आलूरे, सोसायटीचे माजी चेअरमन विश्वनाथ कारले, माजी उपसरपंच बसवराज माळगे, ग्रामपंचायत सदस्य रेवण दरेकर, सोसायटीचे संचालक विजयकुमार यादगौंडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास सादिकअली इनामदार गुरूजी, प्रभाकर वाडीकर, भागवत वाडेकर, वसंत टाळकुटे, सतीश गंगणे, विनायक सावंत, बालाजी पाटील, प्रल्हाद वाडीकर, शशिकांत औसेकर, शिवा कुंभार, श्रीशैल्य नागठाण, अंकुश सावंत, दत्तात्रय शेवाळे, शेखर स्वामी, विश्वनाथ स्वामी, होर्टीचे सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सराटे आदींनी उपस्थित राहून चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सादिकअली इनामदार यांनीही मनोगत व्यक्त केले.

समाजाच्या विकासात योगदान चाकूरकर यांनी साठ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत देशाच्या आणि समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. सत्य, संयम व सुसंस्कार त्यांनी आचरणात आणले. 'बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पाऊले' या म्हणीप्रमाणे त्यांनी प्रेरणादायी जीवन जगले. धर्म सत्ता ही नैतिकता शिकवते, तर राजकीय सत्ता ही विकास व देशहित शिकवते; त्यांनी हे दोन्ही करत सध्याच्या भेसळ युगात युगपुरूष ठरले. त्यांनी राजकारणात कामाला महत्त्व दिले. ते राजकारणातील अत्यंत अभ्यासू व स्वच्छ प्रतिमा असलेले राजहंस होते, असे भीमाशंकर हासुरे यांनी सांगितले.

# अधिवेशनात झालेले अधिकाऱ्याचे निलंबन मागे घ्या अन्यथा १९ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद

धाराशिव,(प्रतिनिधी)-नागपूर हिवाळी अधिवेशनात १२ डिसेंबर रोजी पुणे जिल्ह्यातील ४ तहसिलदार, ४ मंडळ अधिकारी व २ ग्राम महसूल अधिकाऱ्यावर गौण खनिजप्रकरणात तडकाफडकी निलंबनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईचा महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेच्या धाराशिव शाखेने निषेध केला आहे. तसेच याप्रकरणी पुणे जिल्हा संघटनेने सुरू केलेल्या आंदोलनास पाठिंबा देण्यात येत असल्याचे निवेदन विभागीय आयुक्तांना देण्यात आले.

विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित अधिकार्यांना बाजू मांडण्याची कोणतीही संधी न देता अथवा चौकशी अहवालाची शहानिशा न करता थेट निलंबन म्हणजे नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन आहे. रात्रंदिवस काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अशा प्रकारे खच्चीकरण झाल्यास प्रशासन चालविणे कठीण होईल.

महसूल विभागातील तहसिलदार, नायब तहसिलार व कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक प्रश्न, वेतनत्रुटी आणि संरक्षणाचे मुद्दे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. वारंवार विनंत्या करूनही कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. परंतु कारवाई करताना दाखविलेली तत्परता चीड आणणारी आहे. चांगल्या कामाची दखल नाही पण न केलेल्या चुकीची शिक्षा मात्र लगेच हे धोरण संघटना खपवून घेणार नाही.

निलंबन कारवाईच्या निषेधार्थ पुणे जिल्हा संघटनेने पुकारलेल्या कामबंद आंदोलन आणि सामूहिक रजा आंदोलनास धाराशिव जिल्हा संघटनेचा सक्रिय पाठिंबा आहे. नायब तहसिलदार यांच्या ग्रेड पे बाबतही अद्याप कारवाई झालेली नाही.

त्यामुळे विधिमंडळात तहसिलदार, नायब तहसिलदार व मंडळ अधिकाऱ्यांचे झालेले एकतर्फी निलंबन मागे घ्यावे अन्यथा १९ डिसेंबरपासून धाराशिव जिल्हा संघटनेच्या वतीने बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल. कायदा व सुव्यवस्था अथवा प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी शासन जबाबदार असेल असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर धाराशिव जिल्हा संघटनेच्या अध्यक्ष डॉ.मृणाल जाधव, सचिव सचिन पाटील, कार्याध्यक्ष अरविंद बोळंगे, उपाध्यक्ष संतोष पाटील, सहसचिव प्रकाश व्हटकर, संघटक विशाखा बलकवडे, कोषाध्यक्ष महादेव शिंदे, महिला प्रतिनिधी कांचन जाधव, मांजरा प्रकल्पाचे उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी अरूणा गायकवाड, तहसिलदार (संगायो) डी.एफ. गायकवाड, तहसिलदार एच.ए. ढोकले (कळंब), पी.ए. म्हेत्रे (वाशी), गोविंद येरमे (उमरगा), जयवंत पाटील (भूम), नायब तहसिलदार भीमाशंकर बेरूळे (उमरगा), रतन काजळे (लोहारा), अमर आटोळे (भूम), अनिल अहिरे (लोहारा), गोकुळ भराडिया (कळंब), एम.डी. बेजगमवार (धाराशिव) यांची स्वाक्षरी आहे.

# २९९ कारवाया करुन २,३८,३०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१६डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २९९ कारवाया करुन २,३८,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649